
# श्रीमद्भगवद्गीता

मराठी श्लोकानुवाद

शशिकांत भगवान कोंडेजकर



# ॥श्रीमद्भगवद्गीता॥

अनुवादक लेखक

शशिकांत भगवान कोंडेजकर

प्रकाशन व वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

अनुवादक : **शशिकांत भगवान कोंडेजकर**

sbkondejkar@yahoo.com

फोन नंबर. 9960241617

प्रकाशक : **ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २६ ऑक्टोबर २०१४

©esahity Pratishthan® 2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

॥ श्री ॥

॥ प.पू.सद्गुरू श्री. पृथ्वीराज(बापूसाहेब)भालेराव९॥

॥ सुव्रतस्वामी ॥

हृदयी श्री रेणुका वसे । श्रीधराची कृपा असे ।
श्री सुव्रतस्वामी असे । मम हृदयी सदा वसे ॥
हे गुरो सुव्रतस्वामी । कृपेचा अभिलाषि मी ।
ठेउनि मज एक नामी । सार्थ करा या इहजन्मी ॥
अनन्यभावे चिंतन । करावे श्री सुव्रताचे ।
तेच पाहतात पहा । आपल्या योगक्षेमाचे ॥

ॐ

॥श्रीम**द्‌भ**गवद्गीता॥

अथ करन्यास:

ॐ अस्य श्रीमद्‌भगवद्‌गीतामालामन्त्रस्य भगवान्वेदव्यास ऋषि:।अनुष्ठुप छंद:।श्रीकृष्ण परमात्मा देवता।अशोच्यानन्वेचस्त्वं प्रज्ञसवादांश्च भाषसे इति बीजम् ॥सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज इति शक्ति: ॥ अहं त्वा सर्व पापेभ्ये मोक्षयिष्यामि मा शुच इति कीलकम् ॥ नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावक: इत्यङ्गुष्ठाभ्यां नम: ॥न चैनं क्लेदयन्त्येपो न शोषयति मारुत इति तर्जनीभ्यां नम: ॥ अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्यएव च इति मध्यमाभ्यां नम: ॥नित्य: सर्वगत: स्थाणुरचलोऽयं सनातन: इत्यनामिकाभ्यां नम: ॥पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्त्रश इति कनिष्ठिकाभ्यां नम: ॥नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतानि च इति करतलपृष्ठाभ्यां नम: ॥इति करन्यास: ॥

अथ हृदयादिन्यास:

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावक: इति हृदयाय नम: ॥न चैनं क्लेदयन्त्येपो न शोषयति मारुत इति शिरसे स्वाहा ॥ अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्यएव च इति शिखायै वषट् ॥नित्य: सर्वगत: स्थाणुरचलोऽयं सनातन: इति कवचाय हुम् ॥पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्त्रश इति नेत्रत्रयाय वौषट् ॥नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतानि च इति अस्त्राय फट् ॥श्रीकृष्ण प्रीत्यर्थे पाठे विनियोग: ॥

ॐ पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्ये महाभारतम् ।

अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनीमम्ब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ॥1॥

नमोऽस्तुते व्यास विशालबुद्धे फुल्लारविन्दायतपत्रनेत्र।येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ॥2॥

प्रपन्नःपारिजाताय तोत्रवेत्रैकपाणये।ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नमः ॥3॥

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥4॥

भीष्मद्रोणतटा जयद्रथजला गान्धार नीलोत्पला शल्यग्राहवती कृपेण वहनी कर्णेन वेलाकुला ।

अश्वत्थामविकर्णघोरमकरा दुर्योधनावर्तिनी सोत्तीर्णा खलु पाण्डवै रणनदी कैवर्तकः केशवः ॥5॥

पाराशर्यवचःसरोजममलं गीतार्थगन्धोत्कटं नानाख्यानककेसरं हरिकथासम्बोधनाबोधितम्।

लोके सज्जनषट्पदैरहरहः पेपीयमानमुदा भूयाद्भारतपङ्कजं कलिमलप्रध्वंसि नः श्रेयसे ॥6॥

मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम्।यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥7॥

## अथ गीतामाहात्म्यम्

गीताशास्त्रमिदं पुण्यं यः पठेत्प्रयतः पुमान् ।विष्णोः पदवाप्नोति भयशोकादिवीर्जतः ॥1॥

गीताध्ययनशीलस्य प्राणायामपरस्य च ।नैव सन्ति हि पापानि पूर्वजन्मकृतानि च ॥2॥

मलनिर्मोचनं पुंसां जलस्नानं दिने दिने ।सकृद्गीताम्भसि स्नानं संसारमलनाशनम् ॥3॥

गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः ।या स्वयं पद्मनाभस्य मुखपद्माद्विनिःसृता ॥4॥

भारतामृतसर्वस्वं विष्णोर्वक्त्राद्विनिःसृतम् ।गीतागङ्गोदकं पीत्वा पुनर्जन्म न विद्यते ॥5॥

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः।पार्थो वत्स सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥6॥

एकं शास्त्रं देवकी पुत्रगीतमेको देवो देवकीपुत्र एव ।

एको मन्त्रस्तस्य नामानि यानि कर्माप्येकं तस्य देवस्य सेवा ॥7॥

## अथ ध्यानम्

शान्ताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभाङ्गम् ।
लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानिगम्यं वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ॥

यं ब्रह्मा वरुणेन्द्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवै र्वेदैः साङ्गपदक्रमोपनिषदैर्गायन्ति यं सामगाः ।

ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यन्ति यं योगिनो यस्यान्तं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ॥

## ॥ श्रीमद्भगवद्गीता ॥

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

॥ श्री गणेशाय नमः ॥ श्री सरस्वत्यै नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ श्री सुव्रताय नमः ॥ श्री रेणुकायै नमः ॥ श्रीलक्ष्मीनृसिंहाय नमः ॥

॥ श्री गोपालकृष्णाय नमः ॥

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम्।

देवीं सरस्वतीं व्यासं ततो जय मुदिरयेत्॥

॥ ॐ श्री परमात्मने नमः॥

*॥ श्री गणेशाय नम ॥*

*वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ । निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ॥*

*देवा प्रचंडा वक्रतुंडा कोटिसुर्याची कांति तुझी । सर्व कार्यी सर्व काळी वार तू विघ्ने माझी ॥*

*गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः । गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ॥*

*ब्रह्मा विष्णु महेश श्री गुरु त्यात प्रतीत । जे परब्रह्म साक्षात तया मी नमस्कारित ॥*

# दिव्यं ददामी ते चक्षु

जगभर लाखो करोडो लोक आज भगवद्गीता वाचतात. तुम्ही वाचली का? का वाचावी?

जगामध्ये आज ज्ञान आणि विज्ञानाचा प्रचंड स्फ़ोट झाला आहे. असंख्य विषयांवरील लाखो करोडो पुस्तकं, ऑडिओ, व्हिडिओ आपल्या अवती भवती उपलब्ध आहेत. इतकी माहिती , इतकी उलटसुलट माहिती फ़िरते आहे की आपल्याला काय करावे ते कळत नाही. सगळा गोंधळ झाला आहे. काय शिकावे, किती शिकावे आणि शिकून नेमके करावे काय? आपला अर्जुन झाला आहे. आणि गरज आहे भगवद्गीतेची. नेमकं कसं जगावं हे सांगणाऱ्या, सततच्या टेन्शनमधून बाहेर काढणाऱ्या, मार्ग दाखवणाऱ्या भगवद्गीतेची गरज आहे. म्हणून जगभर लाखो करोडो लोक आज भगवद्गीता वाचतात. केवळ एक धार्मिक ग्रंथ म्हणून नव्हे तर एक मार्गदर्शक म्हणून. तुम्ही वाचली? शेवटची कधी वाचली? नेहमी वाचता का? जवळ बाळगता का? तुमच्या मोबाईलमध्ये आहे का? कारण गीता वाचताना प्रत्येकवेळी तिच्यातून काही ना काही नवीन मिळते. जर शंभर वेळा वाचली असेल तर एकशे एकाव्या वेळी सुद्धा काही नवीन संदेश मिळतो. म्हणून तर गीता नेहमी हाताशी हवी. मोबाईलप्रमाणे. मोबाईलमध्येच.

इंटरनेटवर आणि ऍपवर भगवदगीता उपलब्ध आहे. आज ई साहित्य प्रतिष्ठानने जी भगवद्गीता सादर करीत आहे ती खास आहे. गीतेच्या प्रत्येक श्लोकाशेजारी त्याचा मराठी अर्थ सांगणारा श्लोक असलेली ही गीता आहे. श्री शशिकांत कोंडेजकर यांनी अथक प्रयत्नांतून अनुवाद केलेली ही गीता त्यांनी विनामूल्य उपलब्ध करून दिली आहे. ही गीता आपण विनामूल्य डाऊनलोड करू शकता,

मित्रांना फ़्री फ़ॉरवर्ड करू शकता. मोबाईलवर वाचू शकता. गीतेची ही प्रत किमान पन्नास लाख मराठी वाचकांपर्यंत नेण्याचा आमचा निर्धार आहे. आणि या प्रयत्नासाठी तुमचा हातभार लागावा ही कळकळीची विनंती आहे.

भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला विश्वरूप पहाण्यासाठी जे दिव्य चक्षु दिले ते आपल्या सर्व समाजाला लाभोत. सर्वांनी गीता वाचावी. सर्वांनी ती समजून घ्यावी. गीतेचा मराठी अमृतानुभव घेण्यासाठी ज्ञानेश्वरी वाचावी. ई साहित्य प्रतिष्ठानच्या वेबसाईटवर ती सुद्धा उपलब्ध आहे. वाचायला वेळ नसेल तर तिचा ऑडिओ आहे. प्रवासात मोबाईलवरून ऐकत जा. भक्तीयोगाच्या अंगाने गीता समजून घेतल्यावर कर्मयोगाच्या अंगानेही समजून घेण्यासाठी लोकमान्य टिळकांनी लिहीलेले गीता रहस्य वाचा. तेही ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े लवकरच विनामूल्य उपलब्ध होणार आहे. भगवद्गीता वाचा. समजून उमजून वाचा. आपल्याला दिव्य चक्षु लाभल्याचा प्रत्यय येईलच.

आपण ही भगवद्गीता आपल्या ओळखीच्या किमान एकवीस लोकांना मेल, ब्ल्यु टुथ, पेन ड्राईव्ह वा अन्य प्रकारांनी द्यावी अशी आमची विनंती आहे. ही गीता कायम आपल्या डेस्कटॉपवर आणि मोबाईलमध्ये बाळगा. जास्तीत जास्त लोकांमध्ये तिचा प्रचार आणि प्रसार करा.

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

# ॥अथ श्रीमद्भगवद्गीता ॥

# प्रथमोऽध्यायः।

# अर्जुनविषादयोग

धृतराष्ट्र उवाच।

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः।

मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ॥1॥

संजय उवाच।

दृष्ट्वा तु पांडवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा।

आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत ॥2॥

पश्यैतां पांडुपुत्राणामाचार्य महतीं चमुम्।

व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ॥3९॥

अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि।

युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ॥4॥

धृतराष्ट्र म्हणाला

धर्मक्षेत्र कुरुक्षेत्रात मिळोनी युध्दातुरे ।

काय केले संजया मम आणि पंडुकुमरे ॥1॥

संजय म्हणाला

सैन्यव्यूहा पांडवाच्या पाहुनी दुर्योधने ।

भीष्मजवळी जाउनी वदली पहा ही वचने ॥2॥

व्यूह रचला धृष्टद्युम्न्ये शिष्य तुमचा हा पहा ।

पांडवांची ही प्रचंड सेनादले तुम्ही पहा ॥3॥

भीम अर्जुनासमान शोभती ते रणात ।

धनुर्धारी द्रुपद आणि सात्यकी विराट ॥4॥

धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च
वीर्यवान्।पुरुजित्कुन्तिभोजश्च शैब्यश्च नरपुंगवः ॥5॥
युधामन्युश्च विक्रान्त उत्तमौजाश्च वीर्यवान्।
सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ॥6॥
अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध व्दिजोत्तम।
नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते ॥7॥
भवान् भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिंजयः।
अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ॥8॥
अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः।
नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ॥9॥

धृष्टकेतु चेकितान काशिराज वीर ते ।
कुंतिभोज शैब्य आणि पुरुजित महान ते ॥5॥
वीर उत्तमौजा आणि पराक्रमी युधामन्यू ।
द्रौपदीचे पाच पुत्र त्या सोबती अभिमन्यू ॥6॥
द्विजश्रेष्ठा ऐक आता आपले ही खास ।
सांगतो सेनापती मी आणखीही खास ॥7॥
आपण नि भीष्म कृपाचार्य आणि कर्ण ।
भूरिश्रवा अश्वत्थामा आणि हा विकर्ण ॥8॥
मजसाठी जीवावर उदार आणि शूर ।
पारंगत शस्त्रात आणि युद्धी ते चतुर ॥9॥

अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम्।
पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥10॥
अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिता:।
भीष्ममेवाभिरक्षन्तु भवन्त: सर्व एव हि ॥11॥
तस्य संजयनयन् हर्षं कुरुवृद्ध: पितामह:।
सिंहनादं विनद्योच्चै: शङ्खं दध्मौ प्रतापवान् ॥12॥
तत: शङ्खाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखा:।
सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत् ॥13॥
तत: श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यंदने स्थितौ ।
माधव: पाण्डवश्चैव दिव्यौ शङ्खौ प्रदध्मतु: ॥14॥

भीष्मरक्षित बळ आपुले अमर्याद आहे ।
भीमरक्षित सेना मज सीमित दिसते आहे ॥10॥
स्वस्थानी राहुनी दक्ष लक्ष इथे ठेवा ।
भीष्मरक्षणार्थ तुमचे सामर्थ्य एकवटवा ॥11॥
शंखनाद भीष्माने केला जणु सिंहनाद ।
ऐकुनि दुर्योधना जाहला अति हर्ष मोद ॥12॥
उठले नंतर शंख ढोल आणि रणवाद्ये ।
त्यांच्या ध्वनिनादाने पहा गगन होई कुंद ॥13॥
पांडव माधव बसुनी शुभ्र अश्वरथी आले ।
त्यांनी त्यांचे दिव्य शंख स्वप्राणाने फुंकले ॥14॥

पाञ्चजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनंजयः।
पौण्ड्रं दध्मौ महाशङ्खं भीमकर्मा वृकोदरः ॥15॥
अनन्तविजयं राजा कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः।
नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ॥16॥
काश्यश्च परमेष्वासः शिखण्डी च महारथः।
धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ॥17॥
धृपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते।
सौभद्रश्च महाबाहुः शङ्खान् दध्मुः पृथक् पृथक् ॥18॥
स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्।
नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ॥19॥

कृष्ण अर्जुने फुंकले देवदत्त पांचजन्य ।
पौण्ड्र महाशंख भीमे फुंकला स्वनामधन्य ॥15॥
अनंत विजय फुंके युधिष्ठिर कुंतिसुत ।
सुघोष मणिपुष्पक फुंकताति माद्रीसुत ॥16॥
धनुर्धारी काशिराज शिखंडी महारथी ।
सात्यकि विराट आणि धृष्टद्युम्न सेनापती ॥17॥
द्रुपद द्रौपदीपुत्र अभिमन्यू पृथ्वीपती ।
वेगवेगळे शंख पहा कसे वाजविती ॥18॥
सर्वांच्या तुमुल रवे नभ पृथ्वी थरथरे ।
धृतराष्ट्र पुत्रांच्या मन हृदया चरचरे ॥19॥

अथ व्यवस्थितान् दृष्ट्वा धार्तराष्ट्रान् कपिध्वजः।
प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पाण्डवः ॥20॥
हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते ।
अर्जुन उवाच।
सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ॥21॥
यावदेतान्निरिक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान्।
कैर्मया सह योद्धव्यमस्मिन् रणसमुद्यमे ॥22॥
योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः।
धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ॥23॥

रथवरी हनुमंत कौरवास तो पहात ।
रण करण्यास्तव अर्जुन गांडीवा उचलीत ॥20॥
कृष्णाला हृषिकेश काय पहा वाक्य वदत ।
अर्जुन म्हणाला ।
सैन्यांच्या मध्यात रथ ठेवा अच्युत ॥21॥
कोण इथे युध्योत्सुक निरखी मी जववरी ।
कोणासव लढू इथे पाहतो मी तववरी ॥22॥
पाहू मी लढण्याला कोण इथे आलेले ।
कोण वांछी कौरवांना कोण राजे जमलेले ॥23॥

संजय उवाच।

एवमुक्तो हृषिकेशो गुडाकेशेन भारत।
सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥24॥

भीष्मद्रोणप्रमुखत:सर्वेषां च महीक्षिताम्।
उवाच पार्थ पश्यैतान् समवेतान्कुरूनिति ॥25॥

तत्रापश्यत् स्थितान् पार्थ: पितृनथ पितामहान्।
आचार्यान्मातुलान्भ्रातृन् पुत्रान्पौत्रासखींस्तथा ॥26॥

श्वशुरान् सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि।
तान्समीक्ष्य स कौन्तेय: सर्वान्बन्धूनवस्थितान् ॥27॥

संजय म्हणाला ।

कृष्ण ऐके अर्जुनाला करि त्याच्या वचनाला ।
रथ नेई उभा करी सैन्य दोहो बाजुला ॥24॥

भीष्म द्रोण मुख्य आणि सर्वांना तू पहा ।
कृष्ण म्हणे अर्जुनास कौरवांस या पहा ॥25॥

अर्जुनास दिसले ते चुलते नि वाडवडिल ।
गुरु बंधु पुत्र पौत्र मित्र तसेच मातुल ॥26॥

दोन्हीही सैन्य भरे सखे आणि श्वशुरांनी ।
रक्ताच्या नात्यांना तेथ देखुनिया मनी ॥27॥

कृपया परयाविष्टो विषीदन्निदमब्रवीत।

अर्जुन उवाच।

दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ॥28॥

सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति।

वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥29॥

गाण्डीवं स्रंसते हस्तात् त्वक्चैव परिदह्यते।

न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः ॥30॥

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव।

न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ॥31॥

न काङ्क्षे विजयं कृष्ण नच राज्यं सुखानि च ।

किं नो राज्येन गोविंद किं भोगैर्जीवितेन वा ॥32॥

व्याकोळून करुणेने बोले तो विषादून ।

अर्जुन म्हणाला ।

मज दिसती कृष्णा हे युध्दोत्सुक माझे जन ॥28॥

अवयव माझे सुटती मुखामध्ये कोरड ती ।

देही ये कंपवात अंगी काटे उठती ॥29॥

गांडिवही सुटे हाता त्वचे लागे हे चटके ।

उभा कसा राहू आता मन माझे हे भटके ॥30॥

दिसताती लक्षणे ही उलटी रे केशवा ।

मारुनी सख्या सर्वांना श्रेय कोणते मिळवा ॥31॥

विजय नको राज्य नको तसले ते सुख नको ।

कृष्णा त्या राज्याचे भोग मज कदा नको ॥32॥

येषामर्थे काङ्क्षितं नो राज्यं भोगा: सुखानि च ।

त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ॥33॥

आचार्या: पितर: पुत्रास्तथैव च पितामहा:।

मातुला: श्वशुरा: पौत्रा: श्याला संबन्धिनस्तथा ॥34॥

एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधूसूदन।

अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतो: किं नु महीकृते ॥35॥

निहत्य धार्तराष्ट्रान्न: का प्रीति: स्याज्जनार्दन।

पापमेवाश्रयेदस्मान् हत्वैतानाततायिन: ॥36॥

तस्मान्नार्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान् स्वबान्धवान्।

स्वजनं हि कथं हत्वा सुखिन: स्याम माधव ॥37॥



राज्य भोग सुख यांना वर्षावे जयांवरी ।

धन प्राणा त्यागुनि ते उभे इथे रणावरी ॥33॥

गुरुजन लेकरे आजे आणि वाडवडिले ।

सासरे मेहुणे नातू संबंधी अन् मातुले ॥34॥

यांना न मारू इच्छी मी मारिले मला जरी ।

देवा त्रिलोक नलगे पृथ्वी मज काय करी ॥35॥

धृतराष्ट्र कुमरांना मारुनि का सुख मिळे ।

आततायी मारिता या जनार्दना पाप मिळे ॥36॥

म्हणून मारण्या यांना मज योग्यता नसे ।

कौरवांना मारता कृष्णा कुठेही सुख ना दिसे ॥37॥

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहतचेतसः।
कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ॥38॥
कथं न ज्ञेयमस्माभिःपापादस्मान्निवर्तितुम्।
कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥39॥
कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः।
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ॥40॥
अधर्माभिभवात् कृष्ण प्रदुष्यन्ति कुलस्त्रियः।
स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥41॥
संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च।
पतन्ति पितरो ह्येषां लुप्तपिण्डोदकक्रियाः ॥42॥

मित्र द्रोह करी कुळ नाशी अशी पातके ही ।
भ्रमित चित्त मोहाने जरि यांना दिसत नाही ॥38॥
जनार्दना सांग का न त्यागू या पापाला ।
कुलक्षये काय पुढे जाणता परिणतीला ॥39॥
नाश कुळाचा बुडवी पूर्वपार कुळधर्म ।
धर्म नासता कुळात पसरेल ना अधर्म ॥40॥
धर्म सोडता कृष्णा बिघडतील लेकिसुना ।
संकर संकट देवा कोसळेल ते पहा ना ॥41॥
तर्पण श्राद्धे त्याने थांबतील त्या कुळात ।
कुळ आणि कुळबुडव्यांना नेइल तो नरकात ॥42॥

दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः।
उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ॥43॥
उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन।
नरकेनियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥44॥
अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम्।
यद्राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनमुद्यताः ॥45॥
यदि मामप्रतिकारमशस्त्रं शस्त्रपाणयः।
धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमकरं भवेत् ॥46॥
संजय उवाच।
एवमुक्त्वाऽर्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत्।
विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ॥47॥

वर्णसंकर दोषाने कुळघात्यांचे पहा ।
उखडतात जातिधर्म कुळधर्म सदा पहा ॥43॥
संपताच कुलधर्म मनुष्यांना जनार्दना ।
ऐकतो अनंत काल नरक असे हो त्यांना ॥44॥
बुद्धिमान आम्ही पहा महापापास तयार ।
सुख आणि राज्यलोभे मारण्यासही तयार ॥45॥
जरी मारतील शस्त्र धरुनि कौरव हाती ।
निःशस्त्र निप्रतिकारी मज तेचि शुभ होती ॥46॥
संजय म्हणाला ।
वदुनी एवढे अर्जुन रथावरी बैसला ।
धनुष्य बाणा त्यागुन शोकमग्न जाहला ॥47॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे

श्रीकृष्णार्जुन संवादे

अर्जुनविषादयोगो नाम प्रथमोध्यायः ॥ 1 ॥

# द्वितियोऽध्याय:।

# सांख्ययोग

संजय उवाच।

तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम्।

विषीदंतमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥1॥

श्रीभगवानुवाच।

कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम्।

अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥2॥

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते।

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥3॥

संजय म्हणाला ।

करुणासागरी बुडाला अश्रुनयन अर्जुन ।

विषादे भरल्या त्याला बोलले मधुसूदन ॥1॥

श्रीभगवान म्हणाले ।

कोण काळी काय तुजला सुचले हे कश्मल ।

न शोभे हे नरवरा ना कीर्ति स्वर्ग देईल ॥2॥

अनुचित तुज पार्थ तुज नको ही षंढता ।

त्याग दुर्बलता मनाची ऊठ लढण्याला अता ॥3॥

अर्जुन उवाच।

कथं भीष्ममहं द्रोणं संख्ये च मधुसूदन।

इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥4॥

गुरूनहत्वा हि महानुभावान्

श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके।

हत्वार्थ कामांस्तु गुरूनिहैव

भुञ्जीय भोगान् रुधिरप्रदिग्धान् ॥5॥

न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो

यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः।

यानेव हत्वा न जिजीविषामस्

तेवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ॥6॥

अर्जुन म्हणाला ।

वंदनाला पूजनाला भीष्म द्रोण योग्य हे ।

लढू त्यांच्याशी कशाला मधुसूदना सांग हे ॥4॥

महात्मा गुरूंना मारू कशाला ।

त्याहून लागेन अन्ना भिकेला ।

रक्तात भिजले ते भोग काय ।

त्यांना वधूनि मी इच्छु काय ॥5॥

जिंकू न जिंकू ठावे कुणाला ।

न जाणतो मी पहा श्रेयसाला

मारू न इच्छी ज्यांना जगाया ।

धृतराष्ट्रपुत्र उभे संगराला ॥6॥

कार्पण्यदोषोपहतस्वभाव:
पृच्छामि त्वां धर्मसंमुढचेता:।
यच्छ्रेय: स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे
शिष्यस्तेहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥7॥

न हि प्रपश्यामि ममापनुद्याद्य
च्द्‌ोकमुच्छोषणमिन्द्रियाणाम्।
अवाप्य भूमावसपत्नमृद्धं
राज्यं सुराणामपि चाधिपत्यम् ॥8॥

संजय उवाच।
एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेश: परंतप।
न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तूष्णीं बभूव ह ॥9॥

कातर हृदयी मम स्वभावा ।
धर्मनीतीचा अर्थ न ठावा
शिष्य तुझा मी शरण तुला रे ।
मार्ग नीट तू सांग मला रे ॥7॥

इंद्रपद लाभले मज जरी ।
भूमी स्वर्ग जिंकले मी जरी
मिळेना यांनी उपाय मजला ।
शोकास या शुष्क वारण्याला ॥8॥

संजय म्हणाला ।
वदला एवढे बोल किरीटी देवकीबाळा ।
न करी युध्द ऐसे कृष्णा तो बोलला ॥9॥

तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत।
सेनयोरुभयोर्मध्ये विषीदन्तमिदं वचः ॥10॥

श्री भगवानुवाच।

अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे।
गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पण्डिताः ॥11॥

न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपाः।
न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम् ॥12॥

देहिनोऽस्मिन् यथा देहे कौमारं यौवनं जरा।
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥13॥

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥14॥

बोलले हे हृषीकेश भारता उपहासून ।
उभयसैन्यी बैसल्या अर्जुनाला शोकमग्न ॥10॥

श्रीभगवान म्हणाले ।

करू नये ज्याचा शोक त्यास पंडिती बोलतो ।
जित्या मेल्या कोणासाठी शोक पंडिता नसतो ॥11॥

कधीही नव्हतो मी किंवा तू हे असे ना घडे ।
असू पुढे सर्व सर्वदा हेच सत्य रोकडे ॥12॥

बाल तरुण म्हातारा जसा तो देह निराळा ।
तसे ना भ्रमती थोर जरि जीवा देह वेगळा ॥13॥

इंद्रिय संयोगे प्राप्त सुख दुःख उष्ण शीत ।
उत्पत्ती लये ते युक्त साहणे युक्त भारता ॥14॥

यं हि न व्यथयन्त्येते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुखःसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥15॥
नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।
उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥16॥
अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम्।
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित् कर्तुमर्हति ॥17॥
अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिण।
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥18॥
य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम्।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥19॥

याने न पावे जो दुःखी तो पुरुष पुरुषर्षभ ।
सुख दुःख सम करून मिळवी मोक्ष दुर्लभ ॥15॥
नसलेले न उपजे असलेल्या अंत नसे ।
सत्य काय असत् कोठे तत्त्वज्ञा स्पष्ट दिसे ॥16॥
जाण तू तो अविनाशी सर्वजगा व्यापला ।
कोणी न दिसे समर्थ त्याचा नाश करण्याला ॥17॥
आत्मा अमर्याद नित्य तसाच नाशरहित ।
शरीरा मात्र असे नाश म्हणून लढ भारत ॥18॥
म्हणे जो मारितो आत्मा वा यास येई मरण ।
त्याने न जाणिले दोन्ही न मारे या न मरण ॥19॥

न जायते म्रियते वा कदाचिन्ना

यं भूत्वा भविता वा न भूयः।

अजो नित्यं शाश्वतोऽयं पुराणो

न हन्यते हन्यमाने शरीरे ॥20॥

वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम्।

कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हन्ति कम् ॥21॥

वासांसि जीर्णानि यथा विहाय

नवानि गृह्णाति नरोपराणि।

तथा शरीराणि विहाय जीर्णान्

यन्यानि संयाति नवानि देही ॥22॥

आत्मा अजन्मा न पावे मृत्युला ।

ना जन्मेल पुढे ना कधी जन्मला

पुरातन अज शाश्वत हा सदा ।

देहा मारता न मरे हा कदा ॥20॥

जाणोनि अविनाशी नित्य अजन्म अव्यय आत्मा ।

सांग पार्था कसे कोणा मारेल पुरुष आता ॥21॥

वसने जुनी सोडुनि मनुष्य ।

नवीन वस्त्रात तो तोचि दृष्य

आत्मा तसा सोडुनि जीर्ण देहा ।

प्रवेशी नव्या तो शरीरी पहा ॥22॥

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥23॥

अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च।
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥24॥

अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते।
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥25॥

अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम्।
तथापि त्वं महाबाहो नैनं शोचितुमर्हसि ॥26॥

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥27॥

शस्त्रे या न करी छिन्न अग्नी न या करी भस्म ।
पाण्याने न भिजे तो वारे न सुकवी त्याला ॥23॥

जळे कापे भिजे वाळे आत्मा हा तसा नसे ।
नित्य स्थिर सर्वव्यापी अचल पुरातन असे ॥24॥

विचारापलीकडे तो न दिसे अविनाशी तो ।
ओळखता असे त्यास शोक तुज न योग्य तो ॥25॥

गमे तुज जन्मे सदा मरण त्यास सर्वदा ।
महाबाहो तरी पार्था शोक तुज न योग्य तो ॥26॥

जन्मल्यास मृत्यू खास मृत झाल्या जन्म असे ।
अटळ या गोष्टीसाठी शोक तुज न योग्य तो ॥27॥

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत।
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥28॥

आश्चर्यवत् पश्यति कश्चिदे
नमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः।
आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति
श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥29॥

देही नित्समवध्योऽयं देहे सर्वस्य भारत।
तस्मात् सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥30॥

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकम्पितुमर्हसि।
धर्म्याद्धि युद्धच्छ्रेयोऽन्यत् क्षत्रियस्य न विद्यते ॥31॥

अव्यक्तातून येती भूते दृष्य होती या जगाला ।
पुनरपि अव्यक्ती जाती शोक त्यांचा कशाला ॥28॥

आत्म्यास आश्चर्य पाहती कोणी ।
यास आश्चर्यच म्हणती कोणी
आश्चर्य हे यास ऐकती कोणी ।
ऐकोनिही यास न जाणे कोणी ॥29॥

देही आत्मा राही त्याला भारता न मारे कोणी ।
म्हणून कोणा सजीवी शोक तुज न योग्य तो ॥30॥

कर्तव्य ठाकता पुढे व्याकुळणे बरे नव्हे ।
क्षत्रिया श्रेयस्कर ते धर्मयुद्धाविण नव्हे ॥31॥

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम्।
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धमीदृशम् ॥32॥
अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ॥33॥
अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यन्ति तेऽव्ययाम्।
संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥34॥
भयाद्रणादुपरतं मंस्यन्ते त्वां महारथाः।
येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥35॥
अवाच्यवादांश्च बहून् वदिष्यन्ति तवाहिताः।
निन्दतस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ॥36॥

स्वर्गाचा उंबरठा हा पार्था मिळे विनायास ।
रणातून लाभे पहा हा तुम्हा क्षत्रियास ॥32॥
आता न तू लढशील या धर्मयुक्त युद्धास ।
घालवून कीर्ति स्वधर्म मिळवशील पापास ॥33॥
अनंतकाळ वर्णितील लोक तुझी दुष्कीर्ति ।
मरणाहून अधिक होय तुज अपकीर्ति ॥34॥
महनीय तुज मारणारे महारथी बोलतील ।
भये रणातून गेला तुच्छ तुज मानतील ॥35॥
ऐकवे न बोल ऐसे बोलतील निंदण्या तूते ।
सामर्थ्या तव तुच्छतील दुःख त्याहून काय ते ॥36॥

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चय ॥37॥

सुखदु:खे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥38॥

एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां श्रुणु।
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबन्धं प्रहास्यसि ॥39॥

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥40॥

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनन्दन।
बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥41॥



पृथ्वी मिळे जिंकल्या ना तरी स्वर्ग निश्चित ।
कुंतिपुत्रा ऊठ युद्धास सज्ज होऊनि आता ॥37॥

सुखा दु:खा सम मान लाभ हानी जया जय ।
न पावशील पापाला ऐसे लढल्यास तू ॥38॥

हा कथिला सांख्ययोग ऐक कर्मयोग आता ।
कर्मबंध त्यागशील बुद्धीने या सर्व पार्था ॥39॥

नाही कर्मारंभा नाश नाही कर्मफल दोष ।
स्वल्प योग साधनही तारील महाभयास ॥40॥

एक निश्चयी बुद्धी या योगात कुरुनंदना ।
बुद्धीस फुटती फाटे सकाम विवेकहीना ॥41॥

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चितः।
वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥42॥
कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम्।
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥43॥
भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम्।
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥44॥
त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन।
निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ॥45॥
यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके।
तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥46॥

अल्पज्ञ शिष्य वेदांचे शब्दफुले फुलविती ।
नाही अन्य काही ऐसे बोलणे पार्था सांगती ॥42॥
जन्माने सकाम कर्माने विधी क्रिया करूनिया ।
ऐश्वर्य स्वर्ग तृप्तीची बुद्धी यांना भोगावया ॥43॥
ऐश्वर्य भोगसक्तांना भूल पडल्या जनांना ।
दृढबुद्धि ईशभक्तीची त्यांना त्याने मिळेना ॥44॥
वेदवर्णित त्रिगुणांतून मुक्त हो अर्जुना ।
आत्मरत भेदहीन दुर्लक्षी लाभरक्षणा ॥45॥
सरोवरे सर्व देती जे जे कूपातून मिळे ।
तसेच ब्रह्मज्ञात्याला वेदज्ञान तसे मिळे ॥46॥

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।
मा कर्मफलहेतुर्भूमा ते संगोऽत्वकर्मणि ॥47॥
योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय।
सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥48॥
दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय।
बुद्धो शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥49॥
बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।
तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥५0॥
कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः।
जन्मबन्धविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयन् ॥51॥

अधिकारी तू कर्माचा कदापि नाही फळाचा ।
न तू कारण फळाला सोस ही ना अकर्माचा ॥47॥
आस सोडूनि योगी हो आणि कर्मे कर पार्था ।
समान करणे सिद्धी असिद्धी योगाचा अर्थ ॥48॥
सारुनि फलाकांक्षी कर्म बुद्धियोगे धनंजया ।
बुद्धीला शरण जा तू फलाकांक्षी अतिहीन ॥49॥
मुक्त पाप पुण्यातून या जन्मी बुद्धियोगी हा ।
म्हणोनि योगास साध कर्मकौशल योग हा ॥५0॥
मुनी ज्ञानी बुद्धियुक्त फळे कर्माची त्यागता ।
परमपद मिळे मोक्ष जन्ममृत्यूतून सुटता ॥51॥

यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति।
तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ॥52॥
श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला।
समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥53॥
अर्जुन उवाच।
स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव।
स्थितधिः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ॥54॥
श्रीभगवानुवाच।
प्रजहाति यदा कामान् सर्वान् पार्थ मनोगतान्।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥55॥

बुद्धि ओलांडील जेव्हा मोह मलीन चिखल ।
पूर्वश्रुत पुढीलही भोगा विरक्त होशील ॥52॥
श्रुतीत काम्य कर्मे रम्य ती लंघून तू स्थिर ।
करी बुद्धी तरी लाभे समाधी योग सत्वर ॥53॥
अर्जुन म्हणाला ।
समाधीत स्थितप्रज्ञ काय बोलतो केशवा ।
स्थिरबुद्धी कोण जाणू राहणे चालणे कसे ॥54॥
श्री भगवान म्हणाले ।
त्यागेल सर्व इच्छांना जेव्हा पार्था मनातल्या ।
आपला आपण तुष्टे तेव्हा स्थितप्रज्ञ जाण ॥55॥

दु:खेष्वनुद्विग्नमना: सुखेषु विगतस्पृह:।
वीतरागभयक्रोध:स्थितधीर्मुनिरुच्यते ॥56॥

य: सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम्।
नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥57॥

यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वश:।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥58॥

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिन:।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥59॥

यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चित:।
इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मन: ॥60॥

दु:ख ज्या न उद्वेगे सुखाला न लालचे ।
प्रीति भय क्रोध जाई तो मुनी स्थिर मन त्याचे ॥56॥

शुभ मिळो वा अशुभ त्याचे ज्यास काय होय ।
द्वेष वा आनंद नसे त्याची बुद्धी स्थिर होय ॥57॥

जसे कासव आखडी सर्वांगा घाली आवर ।
विषयातून इंद्रिया काढी त्याची बुद्धी स्थिर ॥58॥

विषय आहारा त्यागी तरी रस राही मनी ।
परमात्मा देखता तो ही उडोनि जाई झणी ॥59॥

विवेकी जरी कौंतेया राही पुरुष प्रयत्ना ।
इंद्रिये तगडी त्याची जोराने ओढती मना ॥60॥

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः।

वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥61॥

ध्यायतो विषयान्पुंसः सङ्गस्तेषूपजायते।

सङ्गात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥62॥

क्रोधाभ्दवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः।

स्मृतिभ्रंशात्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥63॥

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्वरन्।

आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥64॥

प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते।

प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥65॥

इंद्रियांना आवरोनि मजसी जो रत असे ।

इंद्रिया जो वश करे त्याची बुद्धी स्थिर असे ॥61॥

ध्यास करी विषयाचा त्यास उपजे आसक्ति ।

त्यातून कामना येई न पुरता क्रोध चढे ॥62॥

क्रोधात मूढता येते पडतो त्याने विसर ।

त्याने बुद्धी नासते पतन पावतो नर ॥63॥

प्रेम द्वेषातून मुक्त करे वश इंद्रियास ।

जरी संचरे विषयी प्रसन्नता लाभे त्यास ॥64॥

सर्व दुःखे हारतात प्रसन्न हृदयातून ।

प्रसन्न चित्ता शीघ्र बुद्धि अचल पावते ॥65॥

नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना।
न चाभावयतः शान्तिरशान्तस्य कुतः सुखम् ॥66॥
इन्द्रियाणा हि चरतां यन्मनोऽनुविधीयते।
तदस्य हरति प्रज्ञां वायेर्नाविमिवाम्भसि ॥67॥
तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥68॥
या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥69॥

नसता त्या स्थिरबुद्धी ईशभावना न त्यास ।
चंचलास शांति कोठे कोठून अशांना सुख ॥66॥
इंद्रिये धावता पुढे मन जाई त्याच्या मागे ।
नावेस ओढते वारे तैसे ते नेई बुद्धिला ॥67॥
इंद्रिय विषयातून खेचली इंद्रिये जये ।
सर्वथा महाबाहो ती त्याची बुद्धी स्थिर असे ॥68॥
जगाला रजनी जेव्हा संयमी जागता असे ।
जागती सर्वसामान्य मुनीजना निशा असे ॥69॥

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं
समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत्।
तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे
स शान्तिमाप्नोति न कामकामी ॥70॥

विहाय कामान् यः सर्वान् पुमांश्चरति निस्पृहः।
निर्ममो निरहंकारः स शान्तिमधिगच्छति ॥71॥

एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति।
स्थित्वाऽस्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥72॥

मर्यादा नोलांडे जसा सागर ।
मिळाले जलौघ जरी निरंतर
भोग प्राप्ती ही न चाळवी जयाला ।
शांति तयाला न च कामुकाला ॥70॥

इच्छा अहंकार सांडी ममता त्यागून विचरे ।
त्या निरिच्छ पुरुषाला प्राप्त होई शांति रे ॥71॥

ही शांति ब्रह्मस्थिती मिळता मोहास न पावती ।
अंतकाळ पुढे ठाकता मुक्तब्रह्मानंदा मिळती ॥72॥

इति श्रीमद्भगवद्गीगीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे

श्रीकृष्णार्जुन संवादे

साङ्ख्ययोगो नाम द्वितीयोध्याय: ॥ 2॥

# तृतियोऽध्याय:।

# कर्मयोग

अर्जुन उवाच।

ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन।
तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव ॥1॥

व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे।
तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ॥2॥

श्रीभगवानुवाच।

लोकेऽस्मिन् द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ।
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥3॥

न कर्मणामनारम्भान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते।
न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति ॥4॥

अर्जुन म्हणाला

ज्ञान श्रेष्ठ हे केशवा कर्माहून सांगता ना ।
तरी मज काय युद्धा योजता कसे कळेना ॥1॥

मम मती मग्न होते दुग्ध्यात तव वचना ।
स्पष्ट मार्ग हिताचा तू कृपया मज सांग ना ॥2॥

श्री भगवान म्हणाले

सांख्यांना ज्ञानयोगाने कर्मयोगाने योगिया ।
वर्णिल्या मी लोका पूर्वी दोन निष्ठा धनंजया ॥3॥

कर्म सुरूचि न करता मुक्ति त्यातून न मिळे ।
त्यागूनही त्या कर्मा तरी सिद्धी नच मिळे ॥4॥

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥5॥
कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्।
इन्द्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥6॥
यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन।
कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥7॥
नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः।
शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥8॥
यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः।
तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसङ्ग समाचर ॥9॥

क्षण ही न जाई ऐसा काहीच न करता तैसा ।
गुण स्वभाव प्रकृतीचे करविती कर्मे त्यास ॥5॥
पंचेद्रिया आवरुनि मनी ध्यास तोच करी ।
त्यास मूर्ख म्हणे जन दांभिक तो खरोखरी ॥6॥
परी अर्जुना जो मने सर्व इंद्रिया आवरी ।
आस न ठेवता चालवी कर्मे तो श्रेष्ठ तरी ॥7॥
कर्म न करण्याहून कर्म श्रेष्ठ आचर तू ।
न च आचरिता काही निर्वाह कसा करशी तू ॥8॥
अन्य कर्मे बांधी तुज यज्ञासाठी न बंधन ।
आसक्ति सोडून कर्मा कौतेया आचर तू ॥9॥

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः।
अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्तिष्टकामधुक् ॥10॥
देवान् भावयतानेन ते देवा भावयन्तु वः।
परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ ॥11॥
इष्टान्भोगान् हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः।
तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव सः ॥12॥
यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः।
भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात् ॥13॥
अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः।
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥14॥

बोलले ब्रह्मदेवाने यज्ञ नि लोक निर्मुनि ।
हा यज्ञ तोषेल तुम्हा कामनापूर्ति करूनि ॥10॥
यज्ञाने तोषाल देव तुम्हा संतोष देतील ।
परस्परा संतोषून कल्याणाप्रत पावाल ॥11॥
देव देतील योग्य भोग जेव्हा तुष्टवाल त्यांना ।
त्यांना भाग न देता खाई त्याची चोरची गणना ॥12॥
यज्ञात राहिले खाती होती संत पापमुक्त ।
रांधिती आपणासाठी ते सेविती पाप फक्त ॥13॥
प्राणिमात्र जन्मे अन्ने अन्न होते पावसाने ।
यज्ञाने निर्मिली वर्षा यज्ञ प्रकट कर्माने ॥14॥

कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुजवम्।
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥15॥
एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः।
अघायुरिन्द्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥16॥
यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः।
आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥17॥
नैव तस्य कृतेनार्थो ना कृतेनेह कश्चन।
न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥18॥
तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर।
असक्तो ह्याचरन् कर्म परमाप्नोति पूरुषः ॥19॥

वेदाने वर्णिली कर्मे पुरुषोत्तमे निर्मिले वेदा ।
म्हणोनि तो वेद ब्रह्म यज्ञ कर्मी असे सदा ॥15॥
यज्ञचक्रा या सोडून भोगतृप्तीत राहती ।
जीवित पापपूर्ण ते निरर्थक ते जगती ॥16॥
रममाण आत्म्याशीच त्याच्या योगे स्वये तृप्त ।
तया काय कार्य उरे जो आत्म्यातचि संतृप्त ॥17॥
केल्या न केल्या कर्माचा त्यास काही लाभ नसे ।
अथवा सर्व भूती ना फलाची अपेक्षा असे ॥18॥
म्हणोनि आस सोडूनि कर्तव्य कर्मा कर ।
निष्काम कर्मे करता परमपद पावे नर ॥19॥

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादय:।
लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि ॥20॥

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जन:।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥21॥

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किञ्चन।
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥22॥

यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतन्द्रित:।
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्या: पार्थ सर्वश: ॥23॥

उत्सिदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम्।
संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमा: प्रजा: ॥24॥

कर्मानेच सिद्धी प्राप्त जनकादि कितीकांना ।
योग्य तुला कर्म असे सांगण्या मार्ग जनांना ॥20॥

नेते महाजन आचरिती तैसे जन वागती ।
श्रेष्ठ जैसे वर्तती तैसे लोक अनुसरती ॥21॥

तिन्ही लोकी पार्था मज कर्तव्य असे नाही ।
कर्मा आचरितो मी जरी न लगे मज काही ॥22॥

हेळसांड करीन मी नियत कर्तव्या पार्था ।
जनलोक सोडतील तसेच कर्तव्यपथा ॥23॥

नष्ट होतील हे लोक न केल्यास कर्म मी ।
संकरास लोकनाशा होईन ना कारण मी ॥24॥

सक्ता: कर्मण्याविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत।
कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥25॥

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम्।
जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्त: समाचरन् ॥26॥

प्रकृते: क्रियमाणानि गुणै कर्माणि सर्वश:।
अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ॥27॥

तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयो:।
गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते ॥28॥

प्रकृतेर्गुणसंमूढा: सज्जन्ते गुणकर्मसु।
तानकृत्स्नविदो मन्दान् कृत्स्नविन्न विचालयेत् ॥29॥

अजाण जरी आशेने भारता कर्मे करिती ।
ज्ञात्यांनी नेतृत्वासाठी निष्कामे आचरावी ती ॥25॥

गोडी ज्यांना होय कर्मी त्यांना गोंधळवू नये ।
विद्वानांनी सर्व कर्मे करण्याचे सोडू नये ॥26॥

घडणारी सर्व कर्मे प्रकृतीच्या त्रिगुणांनी ।
अहंकारी मूर्ख नर स्वत:सच कर्ता मानी ॥27॥

ज्ञानी जाणे महाबाहो भिन्नता गुण कर्माची ।
इंद्रिये जातील भोगा सोडी आस जाणुनी ॥28॥

अल्पबुद्धी कर्मी रत प्रकृती गुणे मोहित ।
चाळवू नयेचि त्यांना पुरुषाने ज्ञानवंत ॥29॥

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा।
निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥30॥

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानवाः।
श्रद्धावन्तोऽनसूयन्तो मुच्यन्ते तेऽपि कर्मभिः ॥31॥

ये त्वेतदभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम्।
सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः ॥32॥

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि।
प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥33॥

इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।
तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपन्थिनौ ॥34॥

मजवरी कर्मे सोड जाणुनि आत्मज्ञानाला ।
आशा ममत्व सोडून लढ त्यागून शंकेला ॥30॥

या मम मते श्रद्धेने द्वेष सोडून वर्तती ।
त्या नरा कर्मातून खचित मिळेल मुक्ति ॥31॥

मजप्रती द्वेषाने जे या मतास ठोकरती ।
ते मूर्ख विवेकहीन ज्ञान हरवून बसती ॥32॥

ज्ञानीही आचरे पहा स्वतःच्या स्वभावास ।
प्रभावी प्रकृती आहे काय करे निग्रहास ॥33॥

इंद्रियांना विषयात प्रीति द्वेष भाव असे ।
त्या भावा वश न व्हावे मोक्षमार्गा आड असे ॥34॥

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्।
स्वधर्मे निधनं श्रेय:परधर्मो भयावहः ॥35॥

अर्जुन उवाच।

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः।
अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥36॥

श्रीभगवानुवाच।

काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः।
महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥37॥

धूमेनाव्रियते वह्निर्यथादर्शो मलेन च।
यथोल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ॥38॥

उत्तम परधर्माहून उणा स्वधर्म बरा ।
स्वधर्मी मरणही श्रेष्ठ परधर्म नव्हे खरा ॥35॥

अर्जुन म्हणाला ।

मग कोणत्या प्रेरणेने पाप आचरती जन ।
अनिच्छेने श्रीकृष्णा बळाने जणु ते जन ॥36॥

श्री भगवान म्हणाले ।

रजोगुणातून आला हा काम हा तसा क्रोध ।
सर्वभक्षी महापापी वैरी हा जाण या जगी ॥37॥

यानेच झाकले ज्ञान अग्नीला वेष्ठितो धूर ।
धुळीने आरसा जसा अथवा गर्भास वार ॥38॥

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा।
कामरूपेण कौन्तेय दुष्पूरेणानलेन च ॥39॥

इन्द्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते।
एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥40॥

तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ।
पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥41॥

इन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः।
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥42॥

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना।
जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥43॥

काम हाच अग्नी पार्था जो कधी संतुष्ट ना ।
ज्ञात्यांचा हा सदा वैरी यानेच झाकले ज्ञाना ॥39॥

मन बुद्धि अवयव कामाचे निवासस्थान ।
साह्य घेत त्यांचे मोही आत्म्या ज्ञान आच्छादून ॥40॥

यास्तव भरतश्रेष्ठा आवरून इंद्रियांना ।
ज्ञानविज्ञान नाशक पापी कामास मार तू ॥41॥

श्रेष्ठ स्थूलाहून इंद्रिये त्याहून असे मन ।
मनापुढे बुद्धि होय त्याउपरी आत्मा जाण ॥42॥

बुद्धीहून थोर आत्मा जाणून तू स्थिरमने ।
दुष्कर काम हा शत्रू जिंकून घे महाबाहो ॥43॥

इति श्रीमद्भगवद्गीगीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे

श्रीकृष्णार्जुन संवादे

कर्मयोगो नाम तृतीयोध्यायः ॥ 3 ॥

# चतुर्थोऽध्यायः।

# ज्ञानकर्मसंन्यासयोग

श्रीभगवानुवाच।

इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्।
विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवित् ॥1॥

एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः।
स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥2॥

स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः।
भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ॥3॥

अर्जुन उवाच।

अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः।
कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति ॥4॥

श्री भगवान म्हणाले ।

अविनाशी योग हा मी कथिला सवितादेवा ।
मनूला दिनकराने इक्ष्वाकूस तो मनूने ॥1॥

गुरुशिष्य परंपरा ही राजऋर्षींनी जाणली ।
काळाने परी खंडला योग महान हा पार्था ॥2॥

तोच योग पुरातन कथितो आज अर्जुना ।
तू माझा सखा भक्त रहस्य ऐक हे दिव्य ॥3॥

अर्जुन म्हणाला ।

जन्म तुमचा आजचा सविता किती जुना ।
सांगा सांगितला कसा योग मज तो कळेना ॥4॥

श्रीभगवानुवाच।

बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन।
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥5॥

अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन्।
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममामया ॥6॥

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥7॥

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥8॥

श्री भगवान म्हणाले ।

तुझे माझे किती जन्म होऊन गेले अर्जुना ।
आठवती मज सर्व परंतपा तुज स्मरेना ॥5॥

अविनाशी मज ना जन्म मी प्राण्यात ईश्वर ।
तरी माझ्याच मायेने मी घेतसे अवतार ॥6॥

-हास होतो धर्म जेव्हा भूतली या भारता ।
अधर्म जोरास येता प्रकट होतो मी स्वतः ॥7॥

संतसज्जना रक्षण्या दुष्टांच्या नाशासाठी मी ।
धर्माच्या स्थापनेसाठी युगायुगात जन्मे मी ॥8॥

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्वतः।
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥9॥

वीतरागगभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः।
बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥10॥

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्।
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥11॥

काङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः।
क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥12॥

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।
तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ॥13॥

माझ्या या दिव्य जन्मास आणि कर्मास जो जाणे ।
पुनर्जन्म त्यास नसे त्यास मजसी मिळणे ॥9॥

माझ्यात स्थित झाले जे त्यजिले क्रोध भय प्रेम ।
किती ज्ञानी तपस्वी ते मिळाले स्वरूपी मम ॥10॥

ज्या भावे जे शरणागत देतो तसे त्यांना फळ ।
पार्था अनुसरती ते माझाच मार्ग सकळ ॥11॥

कर्मफळाचे आकांक्षी पूजती देव या लोकी ।
त्वरित फळ मिळे कर्मा त्यांना या मनुष्य लोकी ॥12॥

निर्मिले चार वर्णा मी गुणकर्माच्या चिंतने ।
कर्ता जरी मी अव्यय अकर्ता मज जाणणे ॥13॥

न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा।
इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते ॥14॥

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः।
कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥15॥

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः।
तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥16॥

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः।
अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ॥17॥

कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः।
स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥18॥

कर्मे न बांधती मज फलाकांक्षा मज नसे ।
त्याला न बांधती कर्मे जाणतो मज जो ऐसे ॥14॥

जाणून हे केली कर्मे पूर्वी मुक्त महात्म्यांनी ।
पूर्वजांसम त्या तैसे आचर नियत कर्मा तू ॥15॥

पंडितांही न कळे कर्म किंवा काय करू नये ।
ते कर्म मी तुज सांगेन जाणता मुक्त होशील ॥16॥

कर्म कशास म्हणावे विकर्म ते काय असे ।
अकर्म तेही जाणावे गूढ कर्म व्याप्ति असे ॥17॥

कर्मात पाही अकर्म अकर्मात दिसे कर्म ।
बुद्धिमान तोचि जाण योगी जरी करी कर्म ॥18॥

यस्य सर्वे समारम्भा: कामसंकल्पवर्जिता:।
ज्ञानाग्निदग्धकर्माणि तमाहु: पण्डितं बुधा: ॥19॥

त्यक्त्वा कर्मफलासंगं नित्यतृप्तो निराश्रय:।
कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित् करोति स: ॥20॥

निरातिर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रह:।
शारिरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥21॥

यदृच्छालाभसंतुष्टो द्वन्द्वातीतो विमत्सर:।
सम: सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबध्यते ॥22॥

गतसंगस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतस:।
यज्ञायाचरत: कर्म समग्रं प्रविलीयते ॥23॥

इच्छा संकल्प त्यागून जो आरंभी कर्मांना ।
ज्ञान अग्नीत जाळी कर्म जाणावे पंडित तया ॥19॥

फळाची सोडून आशा राही तृप्त मुक्त तो ।
करूनही सर्व कर्मे जणू काही न करी तो ॥20॥

निरिच्छ मन बुद्धि ज्या वश स्वामित्व त्यागिले ।
उपजीविके करी कर्म त्यास पाप ना मिळे ॥21॥

सहजी मिळे त्या तुष्ट दुजेपणा मत्सर नाही ।
यशापयशी वृत्ती एक कर्म बंध त्यासी नाही ॥22॥

आसक्ति सोडुनी मुक्त ज्ञानी स्थिर ज्याचे चित्त ।
यज्ञास्तव करी कर्म त्याची कर्मे संपतात ॥23॥

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥24॥

दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते।
ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति ॥25॥

श्रोत्रादीनीन्द्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति।
शब्दादीन्विषयानन्य इन्द्रियाग्निषु जुह्वति ॥26॥

सर्वाणीन्द्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।
आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥27॥

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथापरे।
स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥28॥

हवन कोणते करी कोण काय अग्नि आहुति ।
जायचे कोठे ते सर्व ब्रह्म ब्रह्म नि ब्रह्मचि ॥24॥

देवतांना काही योगी यज्ञ अर्पून पूजिती ।
ब्रह्मरूपी अग्नीत कोणी यज्ञे यज्ञा उपासती ॥25॥

कर्ण नयनादि गात्रे अर्पिती संयमाग्नीत ।
इंद्रियांच्या अग्नीत कोणी शब्दादि विषया अर्पिती ॥26॥

आत्मज्ञानाने चेतला आत्मसंयमाचा अग्नि ।
त्यात अर्पितात कोणी प्राण नि इंद्रीय कर्मे ॥27॥

द्रव्य तप अष्टांगयोग यांचे यज्ञ करिती ।
तसेच वाग्यज्ञ आणि ज्ञान यज्ञा आचरिती ॥28॥

अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथापरे।
प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥29॥
अपरे नियताहाराः प्राणात्प्राणेषु जुह्वति।
सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ॥30॥
यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम्।
नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥31॥
एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ॥32॥
श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप।
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥33॥

श्वासाच्या नियमने जे प्राण वा अपान अर्पिती ।
रोधती किंवा जे श्वास प्राणायामी त्या म्हणती ॥29॥
आहार नियमने कोणी अर्पी प्राण प्राणात ।
यज्ञवेत्ते सर्व यांची नष्ट पातके यज्ञात ॥30॥
या यज्ञाचे अमृत चाखती ब्रह्मपदी जाती ।
ना करी यज्ञ त्यांना ना भूलोक स्वर्ग कोठुनि ॥31॥
अनेक असे हे यज्ञ विस्तारले वेदातून ।
जाणता मोक्ष पावसी उद्भवले कर्मातुन ॥32॥
द्रव्यमय यज्ञाहून ज्ञानयज्ञ श्रेष्ठ जाण ।
अर्जुना सर्व कर्माचे अंतिम ते फल ज्ञान ॥33॥

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥34॥
यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पाण्डव।
येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥35॥
अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः।
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥36॥
यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन।
ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥37॥
न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।
तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति ॥38॥

करूनि गुरूची सेवा नमस्कारे विचारल्या ।
गुरु ज्ञानी तत्त्ववेत्ते देतील दीक्षा तुजला ॥34॥
ज्ञान होता हे पांडवा पुन्हा न मोह तुजला ।
आत्मस्वरूपी माझ्यात दिसेल प्राणिमात्र तुजला ॥35॥
जरी पाप्याहूनही तू असशील अतिपापी ।
तरसी दुःखसागरा नावेतुनी ज्ञानरूपी ॥36॥
पेटलेला अग्नि जसा जाळी लाकडा अर्जुना ।
ज्ञानरूपी अग्नि जाळी कर्मरूपी लाकडांना ॥37॥
ज्ञानासारिखे पवित्र या जगी दुसरे नसे ।
ते सहजी योगयुक्ताला यथाकाली मिळतसे ॥38॥

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः।

ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति ॥39॥

अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति।

नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥40॥

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंछिन्नसंशयम्।

आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनंजय ॥41॥

तस्मादज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः।

छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥42॥

संयमी तत्पर ज्याची श्रद्धा त्यास मिळे ज्ञान ।

त्वरेने दिव्य शांति त्या मिळे मिळोनि ज्ञान ॥38॥

अजाण अश्रद्ध असा नाश पावे संशयाने ।

संशयी त्या आत्म्याला ना इह पर ना सुख ॥40॥

योगाने संपली कर्मे शंका न राही ज्ञानाने ।

ज्ञानी अशा पुरुषाला नाही कर्मबंधने ॥41॥

अज्ञाने जी मनी शंका ज्ञानाच्या खड्गाने छेद ।

संशया त्याग हो योगी ऊठ युद्धास भारता ॥42॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे

श्रीकृष्णार्जुन संवादे

ज्ञानकर्मसंन्यासयोगो नाम चतुर्थोऽध्यायः ॥ 4 ॥

# पञ्चमोऽध्याय:।

# कर्मसंन्यासयोग

अर्जुन उवाच।

संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि।

यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥1॥

श्रीभगवानुवाच।

संन्यासं कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ।

तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥2॥

ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न काङ्क्षति।

निर्द्वन्द्वो हि महाबाहो सुखं बन्धात्प्रमुच्यते ॥3॥

सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः।

एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम् ॥4॥

अर्जुन म्हणाला ।

कर्म संन्यास वदता कृष्णा योगा वाखाणसी ।

ज्या एके मिळेल श्रेय निश्चित का न सांगसी ॥1॥

श्री भगवान म्हणाले ।

संन्यास अथवा योग दोन्ही मोक्षास नेती ।

कर्मसंन्यासाहुनि त्यात कर्मयोग उत्तम ॥2॥

इच्छा द्वेष नसे ज्याला जाण नित्य संन्यासी तो ।

महाबाहो ना ज्या द्वंद्व सहजचि बंधमुक्त तो ॥3॥

सांख्य आणि योग भिन्न अज्ञ बोलती न पंडित ।

त्यांना दोन्ही एक मार्ग मोक्ष प्राप्ती ती दोन्हीत ॥4॥

यत् सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते।
एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति ॥5॥

संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः।
योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाधिगच्छति ॥6॥

योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेन्द्रियः।
सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥7॥

नैव किंचित् करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित्।
पश्यञ्शृण्वन्स्पृशञ्जिघ्नन्नश्नन्गच्छन्स्वपन्श्वसन् ॥8॥

प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन् ॥9॥

सांख्य ज्या स्थानी जाईल योग्याला तेच मिळेल ।
सांख्य आणि योग एक तो जाणता जो जाणेल ॥5॥

कर्म योगा न आचरता संन्यास कठिण असे ।
योग्यास सत्वर ब्रह्म महाबाहो लाभतसे ॥6॥

योगी शुद्ध संयमी जो इंद्रिया जिकिले ज्याने ।
एकरूप सर्वांठायी त्यास ना कर्मबंधने ॥7॥

काहीच न मी करितो योगी तत्त्वज्ञ मानित ।
असलो जरी पहात ऐकत खात झोपत ॥8॥

स्पर्श श्वास दृष्टी आदि क्रियाही करीत ।
इंद्रिये वागती स्वयी योगी असे जाणत ॥9॥

ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः।
लिप्यते न स पापेन पद्मपत्रामिवाम्भसा ॥10॥

कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिन्द्रियैरपि।
योगिनः कर्म कुर्वन्ति संगं त्यक्त्वात्मशुद्धये ॥11॥

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिमाप्नोति नैष्ठिकीम्।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते ॥12॥

सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी।
नवद्वारे पुरे देहि नैव कुर्वन्न कारयन् ॥13॥

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः।
न कर्मफलसंयोगं स्वभावस्ते प्रवर्तते ॥14॥

फलाशा सोडुनी करी कर्म समर्पी ब्रह्माला ।
कमळाच्या पानासम पापापासून निराळा ॥10॥

शुद्ध अशा मन बुद्धि आणि देहा इंद्रियांनी ।
आत्मशुद्धीसाठी योगी कर्म करी आस सोडुनी ॥11॥

योगी कर्मफळा त्यागी मिळवी शांति निष्ठेने ।
फळाचा अभिलाषी जो त्यास पडती बंधने ॥12॥

कर्मे करी तरी मने त्यागूनि सर्व राहतो ।
कर्ता ना करविता नवद्वारी देहा तो ॥13॥

सर्वेश्वर न करी काही प्रेरणा तो देत नाही ।
प्रकृतीच्या गुणे घडे कार्यकारण ही नाही ॥14॥

नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः।
अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः ॥15॥
ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः।
तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥16॥
तद्‌बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः ।
गच्छन्त्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः ॥17॥
विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।
शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः ॥18॥
इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ॥19॥

कोणाचे पाप वा पुण्य घेणे भगवंता नसे ।
ज्ञाना वेढल्या अज्ञाने जीवाला मोह होतसे ॥15॥
ज्ञानाने नाशिल्या ज्याच्या अज्ञाना त्या आत्म्याला ।
ज्ञानाच्या सूर्याने त्या दाखविले परतत्त्वाला ॥16॥ □
बुद्धि निष्ठा तया ठायी तद्रूप ध्यासतो त्यासी ।
ज्ञानाने दोष जाती त्या पुन्हा संसार न त्यासी ॥17॥
विद्येने आलिया विनये ब्राह्मण गज गोमाता ।
श्वान किंवा चांडाळां पंडित पाही एकता ॥18॥
याच जन्मी जिंकी भव मनी ज्या समता असे ।
ब्रह्मासारिखा निर्दोष म्हणोनि ब्रह्मी तो बसे ॥19॥

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् ।
स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रह्मविद् ब्रह्मणि स्थित: ॥20॥
बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विन्दत्यात्मनि यत्सुखम् ।
स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षयमश्नुते ॥21॥
ये हि संस्पर्शजा भोगा दु:खयोनय एव ते ।
आद्यन्तवन्त: कौन्तेय न तेषु रमते बुध: ॥22॥
शक्नोतीहैव य: सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात्।
कामक्रोधोद्‌भवं वेगं स युक्त: स सुखी नर: ॥23॥
योऽन्त:सुखोऽन्तरारामस्तथान्तर्ज्योतिरेव य:।
स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥24॥

प्रिय न त्याला हर्षवी अप्रियाने न दुखवी ।
नि:शंक नि स्थिरमनी ब्रह्मज्ञ तो ब्रह्मी राही ॥20॥
इंद्रियसुखे नकोशी ज्या अंतरातील सुख भोगी ।
जे मिळे ब्रह्माच्या ध्याने योगी सदा त्यात सुखी ॥21॥
दु:खाचे कारण भोग इंद्रियात जन्मतात ।
कौंतेया त्यां आदिअंत ज्ञानी न रमती त्यात ॥22॥
समर्थ जो साहण्याला इच्छा क्रोधाचा जोर ।
देहत्यागाआधी देही तो योगी तो सुखी नर ॥23॥
सुख ज्याचे अंतरी नि रमे तेथे स्वप्रकाशी ।
योगी तोच ब्रह्मरूपी मुक्त तो इहलोकीच ॥24॥

लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः ।

छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥25॥

कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् ।

अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥26॥

स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः ।

प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ ॥27॥

यतेन्द्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः ।

विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः ॥28॥

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।

सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांन्तिमृच्छति ॥29॥

संपता पापे दुविधा आत्मी अंतरी रमती ।

सर्व जगताहिती मग्न ते ऋषि मोक्ष पावती ॥25॥

मुक्त इच्छा क्रोधातून मन ताब्यात ठेवले ।

आत्मतत्त्व जाणले ते येथेच ब्रह्म पावले ॥26॥

बाह्य विषया रोधून भ्रूमध्ये दृष्टी ठेऊन ।

प्राण अपाना समान नासिकेमध्ये करून ॥27॥

मन बुद्धि इंद्रियांना जिकितो जो मोक्षासाठी ।

इच्छा भय क्रोध टाकी तो सदा मुक्त जाणावा ॥28॥

तप यज्ञांचा भोगी मी सर्व देवांचा ईश्वर ।

हितेषु प्राणिमात्रांचा जाणता शांति सुकर ॥29॥

इति श्रीमद्भगवद्गीगीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे

श्रीकृष्णार्जुन संवादे कर्मसंन्यासयोगो नाम

पंचमोध्यायः ॥ 5 ॥

ॐ श्रीपरमात्मनम नमः

# अथ षष्ठोऽध्यायः ।

# आत्मसंयमनयोग

श्री भगवान उवाच।

अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ।
स संन्यासि च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ॥1॥

यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पाण्डव ।
न ह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन ॥2॥

आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते ।
योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥3॥

यदा हि नेन्द्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते ।
सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥4॥

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ॥5॥

श्री भगवान म्हणाले ।

योगी तोच करी कर्म त्याच्या फळा न वांछितो ।
अग्निहोत्र आणि कर्म त्यागी न संन्यासी तो ॥1॥

जो संन्यास तोच योग जाण तू पांडवा सदा ।
ज्याचा न तुटे संकल्प तो योगी न होई कदा ॥2॥

योगाची इच्छा ज्याला त्याला कर्म हे साधन ।
योग साधल्यानंतर शमन होते साधन ॥3॥

नाही इंद्रियासक्त जेव्हा न कर्मी गुंततो ।
योगारूढ त्या म्हणती संकल्प सर्व त्यागतो ॥4॥

स्वतः स्वतःस उद्धारावे धरू नये गती नीच ।
आत्मा त्याचा मित्र होय शत्रुही तोच त्याचाच ॥5॥

बन्धुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जित: ।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥6॥
जितात्मन: प्रशान्तस्य परमात्मा समाहित: ।
शीतोष्णसुखदु:खेषु तथा मानापमानयो: ॥7॥
ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेन्द्रिय: ।
युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकाञ्चन: ॥8॥
सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबन्धुषु ।
साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ॥9॥
योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थित: ।
एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रह: ॥10॥

आत्मा त्याचा मित्र होय मनास त्याने जिंकिल्या ।
तोच त्याचा होय शत्रु नाहीच त्याला जिंकिल्या ॥6॥
मन जिंकी शांत असे त्यास परमात्मा गवसे ।
सुख दु:ख थंड उष्ण मानापमान त्या नसे ॥7॥
तृप्त ज्ञान विज्ञाने जो संयमी अध्यात्मी स्थिर ।
सोने ढेकूळ दगड एक ज्या योगी तो थोर ॥8॥
मित्र शत्रू नि तटस्थ अप्रिय सगा मध्यस्थ ।
बंधु साधु वा पाप्यास समान मानी तो श्रेष्ठ ॥9॥
योगी तल्लीन सतत स्वत: एकांती पहा ।
एकटा जागृत असा त्यागी लालसा संग्रहा ॥10॥

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमानसमात्मनः ।
नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥11॥
तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः ।
उपविश्यासने युञ्ज्याद्योगमात्मविशुद्धये ॥12॥
समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः ।
संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥13॥
प्रशान्तात्मा विगतभिर्ब्रह्मचारिव्रते स्थितः ।
मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥14॥
युञ्जन्नेवं सदात्मानं योगी नियतमानसः ।
शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ॥15॥

तृणावरी मृगचर्म त्यावरी मऊ वसन ।
अती उंच ना सखल शुद्ध जागीचे आसन ॥11॥
मन एकाग्र करून चित्त मात्रे आवरून ।
आत्म्यास शुद्ध करण्या करावे योग आचरण ॥12॥
काया मस्तक मान अचल स्थिर करून ।
दृष्टी नासिकाग्रावरी भोवताल विसरून ॥13॥
शांत निर्भय होऊन ब्रह्मचर्यास पाळावे ।
संयमुनी मना चित्ते मजसी ध्यात बसावे ॥15॥
असे अभ्यासून सदा योगी संयमून मना ।
मोक्षदायी मिळवी तो ममरूपी शांतिसदना ॥15॥

नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः ।
न चाति स्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ॥16॥
युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥17॥
यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते ।
निःस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ॥18॥
यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता ।
योगिनो यतचित्तस्य युञ्जतो योगमात्मनः ॥19॥
यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ।
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥20॥

भोजन अति करे त्याला वा अन्ना पूर्ण त्यागी ।
अतिरेकी ज्याची निद्रा सदा जागा तो ही न योगी॥16॥
भोजन भ्रमण योग्य योग्य काळी करी कर्म ।
जागृती झोप सीमेत त्यास योग दुःखनाशक ॥17॥
असे शिस्तबद्ध चित्त अध्यात्मी करी बद्ध ।
इच्छा त्यागून निरिच्छ होई तोच योगी सिद्ध ॥18॥
दीपकळी शांत गाभारी ही उपमा खरोखरी ।
ध्यानी मग्न योग्यास ज्याचे चित्त आत्म्यावरी ॥19॥
जेथे योग अभ्यासाने चित्त टाकी विषयास ।
आत्मसुखात संतोषे आत्मा पाहुनी आत्म्यास ॥20॥

सुखमात्यन्तिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतीन्द्रियम् ।
वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः ॥21॥
यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ।
यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ॥22॥
तं विद्याद् दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम् ।
स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा ॥23॥
संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः ।
मनसैवेन्द्रियग्रामं विनियम्य समन्ततः ॥24॥
शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया ।
आत्मसंस्थं मनः कृत्वा न किञ्चिदपि चिन्तयेत् ॥25॥



इंद्रिया अगोचर ते बुद्धिगम्य सुख महान ।
ज्या सुखा भोगता योगी न चळे स्वरूपातुन ॥21॥
ज्या सुखा मिळता मानी याहून लाभ नाही खास ।
चाळवी ज्या न महादुःखे सुखातील योग्यास ॥22॥
त्या दुःखस्पर्शविहीन सुखाला योग जाणावा ।
उत्साहे दृढनिश्चये तोच योग अभ्यासावा ॥23॥
संकल्पातून जन्मल्या त्या इच्छा सर्व त्यागून ।
मनाने सर्व इंद्रिया चहूकडून रोखून ॥24॥
धैर्ययुक्त बुद्धीनेच हळूहळू आवरून ।
मन आत्मी गुंतवावे अन्य चिंतने सोडून ॥25॥

यतो यतो निश्चरति मनश्चञ्चलमस्थिरम् ।
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥26॥

प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ।
उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतकल्मषम् ॥27॥

युञ्जन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः ।
सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते ॥28॥

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥29॥

यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥30॥

ज्या कारणे मन जाई जे चंचल मूळचेच ।
खेचावे तेथून मन बांधावे आत्म्साशीच ॥26॥

अशाने ज्या मन:शांति संपला रजोगुण ज्या ।
पापमुक्त ब्रह्मरूपी योग्या परमसुख त्या ॥27॥

मन करी आत्मी स्थिर जो त्याचे संपते पाप ।
साक्षत्कारे ब्रह्माच्या भोगतो तो परमसुख ॥28॥

प्राणीमात्रात स्वत:ला स्वतः सर्व प्राणीसृष्टी ।
पाहे जो योगयुक्त तो होई सर्व समदृष्टी ॥29॥

मीच दिसे ज्या सर्वत्र जो पाहे सर्वत्र मज ।
त्या न दुरावे मी कधी ना तो दुरावे मज ॥30॥

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः ।
सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ॥31॥

आत्मौपन्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मता ॥32॥

अर्जुन उवाच।

योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन ।
एतस्याहं प्रपश्यामि चञ्चलत्यात्स्थितिं स्थिराम् ॥33॥

चञ्चलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥34॥

एकरूप नि सर्वांभूती त्या मज जो भजतो ।
सर्व संसार करूनही मजरूपीच राहतो ॥31॥

स्वतःप्रमाणे सारखे पाही अर्जुना सर्वा ।
सुखदुःखही तसेच तो योगी श्रेष्ठ जाणावा ॥32॥

अर्जुन म्हणाला ।

समदर्शन योग हा बोलला मधुसूदना ।
चंचल मनी मम तो टिकेल असे दिसेना ॥33॥

बलवान कृष्णा मन नाठाळ चंचल क्षुब्ध ।
वाऱ्याला बांधण्या जैसे महाकठीण त्या बंध ॥34॥

श्री भगवानुवाच।

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥35॥

असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः ।
वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ॥36॥

अर्जुन उवाच।

अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः ।
अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥37॥

कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति ।
अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ॥38॥

एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः ।
त्वदन्यः संशयस्यास्य छेत्ता न ह्युपपद्यते ॥39॥

श्री भगवान म्हणाले ।

महाबाहो कठीण हे चंचल मना बांधणे ।
अर्जुना सतत अभ्यासे आवरे वैराग्याने ॥35॥

मज गमे योग दुर्लभ जो नसे संयमी त्याला ।
शक्य गमे प्रयत्ने त्या जो असे संयमी त्याला ॥36॥

अर्जुन म्हणाला ।

श्रद्धा असूनही कृष्णा योग्याचा यत्न खंडला ।
त्या न मिळे योगसिद्धी जाई कोणत्या गतीला ॥37॥

काय मेघ विरे नभी तसा नष्ट होई का तो ।
श्रीकृष्णा अस्थिर असा मोहित मोक्षमार्गी तो ॥38॥

तुजवाचून कृष्णा कोण या संशया वारील ।
समर्थ तूचि तू होय ही शंका निवारशील ॥39॥

श्री भगवानुवाच।

पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।

न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥40॥

प्राप्य पुण्यकृतां लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।

शुचिनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥41॥

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।

एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥42॥

तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।

यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनन्दन ॥43॥

श्री भगवान म्हणाले ।

इहलोकी परलोकी पार्था त्यास नाश नसे ।

शुभ कामे करी मित्रा त्यास अकल्याण नसे ॥40॥

वर्षानुवर्षे भोगोनी स्वर्गादि पुण्यफळे तो ।

शुद्ध श्रीमंताच्या कुळी तो योगभ्रष्ट जन्मतो ॥41॥

अथवा त्यास बुद्धिमंत योग्याच्या घरी जन्म ।

या जगात हा असा अती दुर्लभ हा जन्म ॥42॥

पूर्व संस्कार योगाने चेतना बुद्धीस मिळे ।

कुरुनंदना सिद्धीस पुनरपि यत्न चाले ॥43॥

पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ।
जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥44॥
प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।
अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥45॥
तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ।
कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ॥46॥
योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना ।
श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥47॥

पूर्वअभ्यास आकर्षी योगमार्गाकडे त्यास ।
योगजिज्ञासु तो जाई भेदुनि कर्मकांडास ॥44॥
प्रयत्ने आचरी योगी पापातून शुद्धि पावे ।
अनेक जन्मांनी सिद्धि मिळोनि मोक्षास पावे ॥45॥
तपस्वी ज्ञानी आणि कामी कर्मयोग्याहूनी ।
योगी श्रेष्ठ म्हणूनीच अर्जुना होय तू योगी ॥46॥
योगियामध्येही जो मज चित्ती वास करतो ।
श्रद्धेने भजतो मज तो श्रेष्ठ योगी गमतो ॥47॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां

योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे

आत्मसंयमयोगो नाम षष्ठोध्यायः ॥ 6 ॥

# अथ सप्तमोऽध्यायः ।

# ज्ञानविज्ञानयोग

श्री भगवान उवाच।

मय्यासक्तमनाः पार्थ योगं युञ्जन्मदाश्रयः ।
असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥1॥

ज्ञानं तेऽह सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ।
यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥2॥

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥3॥

भूमिरापोऽनलो वायुः स्वं मनो बुद्धिरेव च ।
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टया ॥4॥

अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ।
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥5॥

श्री भगवान म्हणाले ।

पार्था मम आश्रयाने मन माझ्याशी ठेवून ।
निसंशये पूर्ण योग ऐक तो तुज सांगेन ॥1॥

प्रपंच नि आत्मज्ञान पूर्णत्वे कथितो तुज ।
जाणता न राहील जाणण्यास अन्य तुज ॥2॥

हजारोतून कोणी एक यत्न करि सिद्ध्यर्थ ।
तयातून एखादाच जाणतो मज यथार्थ ॥3॥

धरा जल अग्नि वायू नभ मन बुद्धि आणि ।
अहंकार आठ रूपे ती मम प्रकृती जाण ॥4॥

ही अपरा जाण अन्य याहून परा प्रकृती ।
धारी सर्व जगा पार्था जीवभूत चैतन्य ती ॥5॥

एतद्योनीनि भूतानि सर्वाणित्युपधारय ।
अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥6॥
मत्तः परतरं नान्यत्किञ्चिदस्ति धनंजय ।
मयि सर्वमिदं प्रोक्त सूत्रे मणिगणा इव ॥7॥
रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभास्मि शशिसूर्ययोः ।
प्रणवः सर्व वेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ॥8॥
पुण्यो गन्धः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ ।
जीवनं सर्व भूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ॥9॥
बीजं मा सर्व भूतानां विद्धि पार्थ सनातनम् ।
बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ॥10॥

जाण या दोन्ही पासून प्राणी जग हे उत्पन्न ।
मीच सर्व जगाचा आदि आणि अंत जाण ॥6॥
धनंजया माझ्याहून अन्य काही नाही आणि ।
गुंफले सर्व माझ्यात दोऱ्यात ओवले मणी ॥7॥
कौंतेया रस पाण्यात चंद्रसूर्यात मी प्रभा ।
ॐकार सर्व वेदांत पौरुष मी, शब्द नभा ॥8॥
मृद्गंध मी पृथ्वीचा अग्नीतील तेजही मी ।
मीच जीवन प्राण्यांचे तापसांचे तपही मी ॥9॥
भूतमात्रांचे जे शाश्वत बीज मी जाण अर्जुना ।
तेज मी तेजस्व्यांचे बुद्धि मीच बुद्धिमाना ॥10॥

बलं बलवतां चाहं कामरागविवर्जितम् ।

धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥11॥

ये चैव सात्त्विका भावा राजसास्तामसाश्च्च ये ।

मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि ॥12॥

त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत् ।

मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम् ॥13॥

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।

मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥14॥

न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नराधमाः ।

माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ॥15॥

आसक्ति कामनाहीन बलवंताचे मी बल ।

भरतर्षभा काम मी धर्मास जो अनुकूल ॥11॥

सत्त्व रज तम भावा मीच करी उत्पादित ।

जाण ते जरी माझ्यात तरी मी नसे त्यांच्यात ॥12॥

त्रिगुणाच्या मायेने या मोहीत हे सर्व जग ।

गुणातीत मी अविकारी मज न जाणे जग ॥13॥

माझी ही त्रिगुणी माया तरावयास दुष्कर ।

मजसी येती शरण तयांनाच ती सुकर ॥14॥

मायेने नाशिले ज्ञान ते मूर्ख दुष्ट अधम ।

आसुरी प्रवृत्तीचे ते न येती शरण मम ॥15॥

चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥16॥
तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।
प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ॥17॥
उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ।
आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम् ॥18॥
बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥19॥
कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यन्तेऽन्यदेवताः ।
तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया ॥20॥

भरतश्रेष्ठा अर्जुना भजती मज पुण्यात्मे ।
चार जे ज्ञानी लाभेच्छु जिज्ञासू वा दुःखात्मे ॥16॥
ज्ञानी करी भक्ति माझी एकरूपे एकचित्ते ।
श्रेष्ठ तो त्यासी मी प्रिय मज तो त्यामुळे प्रिय ॥17॥
सर्व हे भक्त भलेचि परी ज्ञानी स्वयं मीचि ।
मम ठायी राही भक्तीने मिळे श्रेष्ठ गतीचि ॥18॥
वासुदेव सर्व जग जाणे अनेक जन्मांनी ।
शरण येई मजसी तो थोर दुर्लभ ज्ञानी ॥19॥
हरपले ज्ञान ज्यांचे त्यांच्या कामनावेगे ।
ते स्वभावे पूजिती अन्य देवता आवेगे ॥20॥

यो यो यां यां तनुं भक्त: श्रद्धयाचिंतुमिच्छति ।
तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥21॥
स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ।
लभते च तत: कामान्मयैव विहितान्हि तान् ॥22॥
अन्तवत्तु फलं तेषां तद्‌भवत्यल्पमेधसाम् ।
देवान्देवयजो यान्ति मद्‌भक्ता यान्ति मामपि ॥23॥
अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धय: ।
परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम् ॥24॥
नाहं प्रकाश: सर्वस्व योगमायासमावृत: ।
मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥25॥

श्रद्धेने पूजण्यासाठी इच्छि भक्त ज्या देवाशी ।
स्थिरावतो मीच त्यांची श्रद्धा त्या देवतेपाशी ॥21॥
श्रद्धेने युक्त होऊन आराधी तो देवतेस ।
मिळवी इच्छित फळ जे मीच निर्मिले खास ॥22॥
अल्पबुद्धि लोकांना त्या फळ मिळे नाशिवंत ।
भजती ज्या तेथ जात भक्त माझे मज प्राप्त ॥23॥
मूढ न मज अव्यक्ता जाणता व्यक्त मानती ।
सर्वोत्तम अविनाशी माझ्या रूपा न जाणती ॥24॥
नाही प्रकट मी सर्वा योगमायेने वेष्ठिलो ।
मूढ न जाणती मज ज्या नाश नसे ना जन्मलो ॥25॥

वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन ।
भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ॥26॥

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेन भारत ।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप ॥27॥

येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रताः ॥28॥

जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतन्ति ये ।
ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम् ॥29॥

साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः ।
प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः ॥30॥

मी जाणे सर्व झालेल्या असलेल्या प्राणिजना ।
होणाऱ्या सर्वा अर्जुना मज कोणीच जाणेना ॥26॥

इच्छाद्वेषात जन्मते सुखदु:खादिचे द्वंद्व ।
जन्मताच त्या मोही गुंतती अर्जुना सर्व ॥27॥

पुण्यकर्मी जनांची ज्या संपलेली सर्व पापे ।
द्वंद्वमोहातून मुक्त होती मम दृढ भक्त ॥28॥

वार्धक्य मरण मोक्षा झटती मम आश्रये ।
ते जाणती सर्व ब्रह्म अध्यात्म अखिल कर्म ॥29॥

अधिभूत अधिदैव अधियज्ञासह मज ।
जाणती योगी पाहती मृत्यूसमयी ही मज ॥30॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे

श्रीकृष्णार्जुन संवादे

ज्ञानविज्ञानयोगो नाम सप्तमोध्यायः ॥ 7 ॥

# अथाष्टमोध्याय: ।

# अक्षरब्रह्मयोग

अर्जुन उवाच।

किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम ।

अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ॥1॥

अधियज्ञ: कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन ।

प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभि: ॥2॥

श्री भगवानुवाच।

अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ।

भूतभावोद्भवकरो विसर्ग: कर्मसंज्ञित: ॥3॥

अर्जुन म्हणाला ।

कसे ब्रह्म अध्यात्म कर्म पुरुषोत्तमा जाणावे ।

अधिभूत अधिदैव काय कशाला जाणावे ॥1॥

देही राही अधियज्ञ मधुसूदना कोण कसा ।

अवसानकाळी योगी तुज जाणतो कसा ॥2॥

श्री भगवान म्हणाले ।

अविनाशी तेच ब्रह्म त्याचा स्वभाव अध्यात्म ।

भूतमात्र उद्भवी जे कार्य तेच जाण कर्म ॥3॥

अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ।
अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर ॥4॥

अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥5॥

यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम् ।
तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः ॥6॥

तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम् ॥7॥

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ।
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन् ॥8॥

नाशिवंत अधिभूत जीव हाच अधिदैव ।
नरश्रेष्ठा अधियज्ञ मी असे पुरुषोत्तम ॥4॥

करूनि स्मरण माझे पावता मृत्युसमय ।
देह त्यागी तो मजसी पावतो नाही संशय ॥5॥

कौंतेया ज्याचे स्मरण अंतकाळी नरा होई ।
ठेवल्याने तिथे चित्त त्या भावास प्राप्त होई ॥6॥

म्हणोनि सर्वदा माझे ध्यान ठेऊनि तू लढ ।
मन बुद्धि अर्पी मज निःशंक पावसी मज ॥7॥

अविचल मनाने जो आणि अभ्यासे योगा तो ।
पार्था निरंतर ध्यातो परमपुरुषा पावतो ॥8॥

कविं पुराणमनुशासितार-

मणोणीयांसमनुस्मरेद्यः ।

सर्वस्व धातारमचिन्त्यरूप-

मादित्यवर्णं तमसः परस्तात् ॥9॥

प्रयाणकाले मनसाचलेन

भक्त्या युक्तो योगबलेन चैव ।

भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक्

स तं परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥10॥

यदक्षरं वेदविदो वदन्ति

विशन्ति यद्यतयो वीतरागाः ।

यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति

तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये ॥11॥

सर्वज्ञानी पुरातन शासक

अणूहूनि सूक्ष्म सर्वांचा पालक ।

तमापार दिव्य सूर्यतेजाहून

करी त्याचे जो सदैव ध्यान ॥9॥

अंतकाळी जो अविचल मने

भक्ति आणिक योग बलाने ।

भ्रूमध्यात स्थापुनिया प्राणास

मिळवी दिव्य परमपुरुषास ॥10॥

वेदज्ञानी अविनाशी म्हणती

महर्षी इच्छा त्यागुनि पावती ।

ज्यास्तव ब्रह्मचर्या आचरती

ते ब्रह्म संक्षेपे तुज सांगतो मी ॥11॥

सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ।
मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ॥12॥
ओमित्येक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥13॥
अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥14॥
मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् ।
नाप्नुवन्ति महात्मनः संसिद्धिं परमां गताः ॥15॥
आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।
मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते ॥16॥

सर्व गात्रे आवरून मन हृदयी रोधून ।
मस्तकी स्थापून प्राण करी योग अनुष्ठान ॥12॥
ॐकार प्रणवाच्या उच्चारे मम ब्रह्माचे स्मरण ।
त्यासवे त्यागी जो देह श्रेष्ठ गती त्यास जाण ॥13॥
मजला स्मरे नित्य जो अनन्यभावे सर्वदा ।
त्यास मी सहजप्राप्त पार्था योगयुक्त भक्ता ॥14॥
मज मिळता महात्म्यांना मिळते परमगती ।
अनित्य दुःखकारक पुनर्जन्मा न मिळती ॥15॥
ब्रह्मभुवनादि लोका पुनरावृत्ती त्यांना ।
जे पावती मज कौंतेया पुनर्जन्म नसे त्यांना ॥16॥

सहस्त्रयुगपर्यन्तमहर्यब्रद्ह्मणो विदुः ।
रात्रिं युगसहस्त्रान्तां तेऽहोरात्रविदो जनाः ॥17॥

अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवन्त्यहरागमे ।
रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ॥18॥

भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते ।
रात्र्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥19॥

परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः ।
यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ॥20॥

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् ।
यं प्राप्य न निवर्तन्ते तध्दाम परमं मम ॥21॥

एक हजार युगांचा दिवस तशीच रात्र ।
दिनमान ब्रह्मदेवाचे जाणती ते अहोरात्रविद ॥17॥

दिनारंभी ब्रह्मदेवाच्या जन्मती जीव व्यक्त रूपे ।
विलोपती त्याच्या रात्री अव्यक्तात तीच रूपे ॥18॥

अर्जुना जीवसमूह पुनः पुनः जन्मे नाशे ।
रात्र येता लय पावे दिन प्रारंभी उपजे ॥19॥

या अव्यक्ताहून पर अव्यक्त आणि शाश्वत ।
त्याचा न होतो नाश जरी नाश पावे जगत ॥20॥

अव्यक्त आणि अक्षर ही परम गती जाण ।
ते माझे श्रेष्ठ धाम जेथून न ये परतून ॥21॥

पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया ।
यस्यान्तःस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ॥22॥

यत्र कालेत्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिनः ।
प्रयाता यान्ति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ॥23॥

अग्निर्ज्योतिरहःशुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।
तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥24॥

धूमो रात्रिस्तथा कृष्ण षण्मासा दक्षिणायनम् ।
तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥25॥

अर्जुना परम श्रेष्ठ पुरुष तो भक्ति अंकित ।
सामावे जीवमात्र ज्यात ज्याने व्यापिले जगत ॥22॥

जन्ममृत्यूतून मुक्ति वा पावे पुनर्जन्मांना ।
कोण काळी त्यागिता देह मिळे सांगतो अर्जुना ॥23॥

देही अग्नि दिन प्रभा शुक्लपक्ष उत्तरायणी ।
सोडता देह ब्रह्मपद जाणतात ब्रह्मज्ञानी ॥24॥

दक्षिणायनी धूसरी रात्री कृष्ण पक्षी मरे ।
चंद्रलोक मिळोनी तो योगी पुनर्जन्म धरे ॥25॥

शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते ।
एकया यात्यनावृत्तिमन्ययावर्तते पुनः ॥26॥

नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन ।
तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ॥27॥

वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव
दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् ।
अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा
योगी परं स्थानमुपैति चाद्यम् ॥28॥

जगी दोन गती नित्य शुक्ल आणि कृष्ण जाण ।
शुक्ल प्रकाशे नाही जन्म कृष्ण तमे पुनर्जन्म ॥26॥

जाणतात योगी मार्ग दोन्ही त्यांना मोह नाही ।
म्हणून सर्व काळी तू अर्जुना हो योगयुक्त ॥27॥

वेदात यज्ञात तपात किंवा
दानातही जो मिळे पुण्यठेवा ।
त्याहून हे थोर जाणून ज्ञान
योग्यास मिळे ते परमस्थान ॥28॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां

योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे

अक्षरब्रह्मयोगो नामाष्टमोध्याय: ॥ ८ ॥

# अथ नवमोऽध्यायः ।

# राजविद्या राजगुह्ययोग

श्री भगवानुवाच।

इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे ।
ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥1॥

राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ।
प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥2॥

अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप ।
अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि ॥3॥

मया तदमितदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ।
मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ॥4॥

न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ।
भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥5॥

श्री भगवान म्हणाले ।

असूयाहीन अर्जुना गुह्यात गुह्य सांगतो ।
विज्ञानासह ज्ञानास जाणता दुःखमुक्तता ॥1॥

परमरहस्य हेचि पवित्र श्रेष्ठ ज्ञान ।
प्रत्यक्ष धर्मानुकूल अव्यय सुलभ ज्ञान ॥2॥

अश्रद्धा आत्मज्ञानी या परंतपा ज्या असते ।
असंभाव्य माझी प्राप्ति मर्त्य जगी तो परते ॥3॥

मी व्यापिले सर्व जग न दिसताही त्यात ।
सर्व भूते माझ्या ठायी नाही त्यांच्यात मी स्थित ॥4॥

भूतमात्र न माझ्यात ऐश्वर्य योग हा पहा ।
सर्वांना धारी पाळी मम आत्मा यांचा उद्भव ॥5॥

यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ।
तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ॥6॥
सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यान्ति मामिकाम् ।
कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥7॥
प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः ।
भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥8॥
न च मां तानि कर्माणि निबध्नन्ति धनंजय ।
उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ॥9॥
मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।
हेतुनानेन कौन्तेय जगद्विपरिवर्तते ॥10॥

सदैव वाहतो वारा सर्वत्र तरी नभी राही ।
भूतमात्र सर्व तसे जाण माझ्यातच राही ॥6॥
प्रकृतीत माझ्या जाती कल्पांती कौंतेया भूते ।
आरंभी कल्पाच्या मीच निर्मितो पुन्हा भूते ॥7॥
माझ्या प्रकृतीच्या योगे निर्मितो मी पुन्हा पुन्हा ।
भूतमात्रे संपूर्ण जी आधीन त्या प्रकृतीस ॥7॥
धनंजया या कर्माचे मजला बंधन नसे ।
उदासीन स्थितीमध्ये कर्मी मी आसक्त नसे ॥9॥
माझ्या प्रभावे प्रकृति प्रकटवी चराचरा ।
तिच्या कारणे कौंतेया चालते संसारचक्र ॥10॥

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ।

परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ॥11॥

मोशाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः ।

राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः ॥12॥

महात्मनस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ।

भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥13॥

सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः ।

नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥14॥

ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते ।

एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ॥15॥

अवतारित मजला मूर्ख ते अवमानिती ।

महेश्वर मी माझ्या दिव्यरूपास न जाणती ॥11॥

आशा कर्मे ज्ञान त्यांचे निष्फळ जे राहती मोही ।

विवेकशून्य राहती आसुरी प्रकृती मोही ॥12॥

दैवी प्रकृतीत स्थित पार्था महात्मे नेहमी ।

भजती अनन्यभावे जाणुनी आदि अव्यय मी ॥13॥

उपासती सदैव ते जपती नामकीर्तने ।

नमस्कारिती भक्तीने पूर्णपणे निश्चयाने ॥14॥

कोणी ज्ञानयज्ञे पूजी मानूनी विराटरूपी ।

एकची अथवा द्वैती किंवा विविध स्वरूपी ॥15॥

अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम् ।
मन्त्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम् ॥16॥
पितामहस्य जगतो माता धाता पितामहः ।
वेद्यं पवित्रमोंकार ऋक्साम यजुरेव च ॥17॥
गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ।
प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् ॥18॥
तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च ।
अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ॥19॥
त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा
यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते ।
ते पुण्यमासाद्य सुरेन्द्रलोकम
श्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगान् ॥20॥

मीच कर्मकाण्ड जाण यज्ञ स्वधा औषधी ।
मंत्र तूप मीच अग्नि मीच आहुती या यज्ञी ॥16॥
पिता या जगाचा मीच प्रपिता माता पोशिंदा ।
प्रणवासह ऋक्साम मीच जाण यजुर्वेदा ॥17॥
ध्येय मी पोषक प्रभु सखा रक्षक साक्षी ।
उत्पत्ती स्थिती लय मी बीज अव्यय निवास ॥18॥
तापतो शोषतो जला पर्जन्याही वर्षतो मी ।
जड चेतन अमरत्व अर्जुना मृत्युही मीच ॥19॥
वेदज्ञ आणि सोमपाना करिती
यज्ञाने स्वर्गाची गती प्रार्थिती ।
पुण्यलोकी इंद्रलोका भोगिती
दिव्य स्वर्गातले देवांचे भोग ॥20॥

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं
क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ।
एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना
गतागतं कामकामा लभन्ते ॥21॥

अनन्यश्चिन्तयन्तो मां ये जना: पर्युपासते ।
तेषां नित्यभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥22॥

येऽप्यन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धयान्विता: ।
तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम् ॥23॥

अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च ।
न तु मामभिजानन्ति तत्त्वेनातश्च्यवन्ति ते ॥24॥

यान्ति देवव्रता देवान्पितृन्यान्ति पितृव्रता: ।
भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपि माम् ॥25॥

रहिवास स्वर्गलोकी भोगुन
संपता पुण्य त्यास पुनर्जन्म ।
करिता वेदधर्माचे पालन
सकामी त्यांना प्राप्त मृत्यूजन्म ॥21॥

अनन्यभावे चिंतन माझे जे करिती लोक ।
योगक्षेम चालवी मी जे माझे भक्त उपासक ॥22॥

अन्य देवता भजती श्रद्धेने जरी साधक ।
अजाणता ते कौंतेया माझेच खरे पूजक ॥23॥

यज्ञ भोक्ता स्वामी मीच या कारणे असे घडे ।
मज न जाणती तत्त्वें म्हणोनि पतन घडे ॥24॥

देवपूजक पितृव्रती भूतप्रेतादि भजती ।
त्या त्या स्थळी ते पावती माझे भक्त मजप्रति ॥25॥

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥26॥
यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥27॥
शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबन्धनैः ।
संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ॥28॥
समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥29॥
अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥30॥

भक्तीनेच मज देई पान फूल फळ पाणी ।
भक्तीने शुद्ध मने दिले अंगिकारी मी झणी ॥26॥
जे कर्म भोजन दान तप अथवा हवन ।
कौंतेया करिसी सर्व कर मज समर्पण ॥27॥
शुभाशुभ फळारूपी सुटशी बंधनातुन ।
पावशील मजप्रति संन्यासयोगी होऊन ॥28॥
कोणी न प्रिय अप्रिय मज सम सर्व भूत ।
भक्तीने भजती ते मजठायी मी त्यांच्यात ॥29॥
दुराचारी जरी दुष्ट अनन्यभावे भजे मज ।
निश्चय त्याचा माझ्यात त्यास साधूचि समज ॥30॥

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति ।
कौन्तेय प्रति जानीहि न मे भक्त: प्रणश्यति ॥31॥
मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्यु: पापयोनय: ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिं ॥32॥
किं पुनर्ब्राह्मणा: पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ।
अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ॥33॥
मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि युक्त्यैवमात्मानं मत्परायण: ॥34॥

शीघ्र धर्मात्मा होतो पावतो शांति शाश्वत ।
कौंतेया सांग सर्वांना नाश ना माझ्या भक्ता ॥31॥
पार्था आश्रया मम येती स्त्रिया शूद्र वैश्य ।
नीच कुळी या सर्वांना परमगति अवश्य ॥32॥
पुण्यवान ऋषि राजे का न मिळे ब्राह्मण भक्ता ।
अनित्य असुखी जगी आला तू मजसी भज ॥33॥
मन अर्पी मज पूज मम नमस्कार भक्ति ।
समर्पित मजसी हो तू मिळशील मजप्रति ॥34॥

ॐ तत्सदिति श्रीमद्‌भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां

योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे

राजविद्याराजगुह्ययोगो नाम नवमोध्याय: ॥ ९ ॥

# अथ दशमोध्यायः ।

# विभूतियोग

श्री भगवानुवाच।

भूय एव महाबाहो श्रृणु मे परमं वचः ।
यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया: ॥1॥

न मे विदु: सुरगणा: प्रभवं न महर्षय: ।
अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वश: ॥2॥

यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम् ।
असंमूढ: स मर्त्येषु सर्वपापै: प्रमुच्यते ॥3॥

बुद्धिर्ज्ञानमसंमोह: क्षमा सत्यं दम: शम: ।
सुखं दु:खं भवोऽभावो भयं चाभयमेव च ॥4॥

श्री भगवान म्हणाले ।

महाबाहो पुन्हा ऐक माझे हे श्रेष्ठ वचन ।
प्रिय सख्या तुजला मी तव हितार्थ सांगेन ॥1॥

जाणती नच महर्षि देव माझा उद्‌भव ।
देव आणि महर्षींचा माझ्याच ठायी उद्‌भव ॥2॥

अनादि जन्मरहित जाणे सर्वेश्वर मज ।
मनुष्यातील सूज्ञ तो तोच होई पापमुक्त ॥3॥

इंद्रिय मन निग्रह ज्ञान बुद्धि क्षमा सत्य ।
निर्मोह दु:ख सुख जन्म मृत्यू अभयभय ॥4॥

अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः ।
भवन्ति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधा ॥5॥
महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनस्तथा ।
मजावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः ॥6॥
एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वतः ।
सोऽविकम्पेन योगेन युज्यते नात्र संशयः ॥7॥
अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते ।
इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः ॥8॥
मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् ।
कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ॥9॥

संतोष अहिंसा साम्य यशायश तप दान ।
जीवांचे गुण विविध मजपासून उत्पन्न ॥5॥
प्राचीन सात सप्तर्षि तसेच मनूही चार ।
माझ्या मनातून जन्म त्यापासून चराचर ॥6॥
ऐश्वर्ययोग माझा जो विभुतीचा जाणे पूर्णतः ।
असंदेहे मज मिळे भक्तियोगे नि निश्चित ॥7॥
सर्वांचे आदिबीज मी सर्व माझ्याच पासुन ।
मज भक्तिभावे ज्ञानी भजती हेच जाणुन ॥8॥
प्राणचित्त मज देत मजसी ते सांगतात ।
वर्णितात मज नित्य आनंदे नि रमतात ॥9॥

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ॥10॥
तेषामेवानुकम्पार्थमहमज्ञानजं तमः ।
नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ॥11॥
अर्जुन उवाच।
परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान् ।
पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम् ॥12॥
आहुस्त्वामृषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा ।
असितो देवलो व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे ॥13॥

निरंतर प्रेमपूर्ण जे मजला भजताती ।
बुद्धिज्ञान त्यांना देतो पोहोचण्या मजप्रति ॥10॥
नष्ट करितो मी स्वतः त्यांचा अंधार अज्ञान ।
तेजस्वी ज्ञानदीपाने चित्ती त्यांच्या राहून ॥11॥
अर्जुन म्हणाला ।
तुम्हीच परमधाम पवित्र ब्रह्म परम ।
अनादि दिव्य पुरुष शाश्वत आणि अजन्म ॥12॥
ऋषि नारद देवल सांगती व्यास असित ।
हेच सत्य हे म्हणती तसेच तू ही वदत ॥13॥

सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव ।
न हि ते भगवन्व्यक्तिं विदुर्देवा न दानवाः ॥14॥
स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम ।
भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते ॥15॥
वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः ।
याभिर्विभूतिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि ॥16॥
कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिन्तयन् ।
केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया ॥17॥
विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन ।
भूयः कथय तृप्तिर्हि श्रृण्वतो नास्ति मेऽमृतम् ॥18॥

मान्य मज कथिले तू हे सर्व केशवा सत्य ।
भगवंता रूप तुझे देवा न दानवा ज्ञात ॥14॥
देवाधिदेवा भूतेशा जाणसी पुरुषोत्तमा ।
जगन्नायका स्वत:च स्वत:ला जगन्नाथा ॥15॥
कथावयास विभूति दिव्य हे तुझे ऐश्वर्य ।
ज्याने व्यापिसी जगता तुजवीण कोण योग्य ॥16॥
योगेश्वरा तुज जाणू कसे तुलाच चिंतता ।
कोणत्या कोणत्या रूपी चिंतू तुज भगवंता ॥17॥
जनार्दना पुन्हा सांगा विस्तारे योग विभुती ।
अमृतवाणी आपली मज ऐकता नाही तृप्ती ॥18॥

श्री भगवानुवाच।

हन्त ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतय: ।
प्राधान्यत: कुरुश्रेष्ठ नास्त्यन्तो विस्तरस्य मे ॥19॥

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थित: ।
अहमादिश्च मध्यं च भूतानामन्त एव च ॥20॥

आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषांरविरंशुमान् ।
मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी ॥21॥

वेदानां सामवेदोऽमि देवानामस्मि वासव: ।
इन्द्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना ॥22॥

श्री भगवान म्हणाले ।

बरे ऐक सांगतो त्या दिव्य मम विभुतींना ।
प्रमुख ऐश्वर्य व्यक्ति परंतु अंत ना त्यांना ॥19॥

गुडाकेशा मीच जाण आत्मा चित्तात सर्वांच्या ।
मीच आदि मध्य आणि अंतही सर्व भूतांचा ॥20॥

मी विष्णु आदित्यांत नभ ज्योतींत सुर्य मी ।
मरीचि मरुद्गणांमध्ये नक्षत्रांतील चंद्र मी ॥21॥

सामवेद वेदांतील देवांमधील इंद्र मी ।
चेतना प्राणिमात्रांत इंद्रियातील मन मी ॥22॥

रुद्राणां शंकरश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम् ।
वसूनां पावकश्चास्मि मेरुः शिखरिणामहम् ॥23॥
पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम् ।
सेनानीमामहं स्कन्दः सरसामस्मि सागरः ॥24॥
महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम् ।
यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः ॥25॥
अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः ।
गन्धर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः ॥26॥
उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम् ।
ऐरावतं गजेन्द्राणां नराणां च नराधिपम् ॥27॥

महादेव रुद्रांमध्ये यक्ष राक्षसी कुबेर ।
वसूंमधील अग्नी मी पर्वतातील मी मेरु ॥23॥
पुरोहितांमध्ये पार्था मुख्य तो बृहस्पति मी ।
कार्तिकेय सेनानींत जलाशयात सागर मी ॥24॥
भृगू जाण महर्षींत ॐकार मीच वाचेत ।
जपयज्ञ यज्ञातील हिमालय स्थावरात ॥25॥
तरूंमधील अश्वत्थ नारद मी देवर्षींत ।
गंधर्वांत चित्ररथ कपिल मुनी सिद्धांत ॥26॥
अमृतमंथनातील जाण उचैःश्रवा मज ।
ऐरावत गजेन्द्रात मनुष्यातील मी राजा ॥27॥

आयुधानामहं वज्रं धेनुनामस्मि कामधुक् ।
प्रजनश्चास्मि कन्दर्प: सर्पाणामस्मि वासुकि: ॥28॥
अनन्तश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम् ।
पितॄणामर्यमा चास्मि यम: संयमतामहम् ॥29॥
प्रल्हादश्चास्मि दैत्यानां काल: कलयतामहम् ।
मृगाणां च मृगेन्द्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम् ॥30॥
पवन: पवतामस्मि राम: शस्त्रभृतामहम् ।
झषाणां मकरश्चास्मि स्रोतसामस्मि जाह्नवी ॥31॥
सर्गाणामादिरन्तश्च मध्यं चैवाहमर्जुन ।
अध्यात्मविद्या विद्यानां वाद: प्रवदतामहम् ॥32॥

धेनूंमध्ये कामधेनु वज्र शस्त्रांतील मीच ।
काम मी प्रजोत्पत्तीस सर्पात वासुकि मीच ॥28॥
अनंत जाण नागांत जलदेवतात वरुण मी ।
अर्यमा पितरांतील नियामकांत यम मी ॥29॥
प्रल्हाद जाण दैत्यांत ग्रासणाऱ्यांत काळ मी ।
पशूंमध्ये वनराज पक्ष्यांतील गरूड मी ॥30॥
वेगवंतांत पवन राम शस्त्रधारकांत ।
मकर जलचरांत गंगा नदी सरितात ॥31॥
सृजनांचा आदि मध्य अर्जुना अंतही मी ।
अध्यात्मविद्या विद्यांत तर्कशास्त्रात वाद मी ॥32॥

अक्षराणमकारोऽस्मि द्वन्द्वः सामासिकस्य च ।
अहमेवाक्षयः कालो धाताहं विश्वतोमुखः ॥33॥
मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम् ।
कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमाः ॥34॥
बृहत्साम तथा साम्नां गायत्री छन्दसामहम् ।
मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः ॥35॥
द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ।
जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम् ॥36॥
वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पाण्डवानां धनंजयः ।
मुनीनामप्यहः व्यासः कवीनामुशना कविः ॥37॥

'अ'कार अक्षरगणी समासी समास द्वंद्व ।
अविनाशी काल मीच सृष्टिकर्ता ब्रह्मदेव ॥33॥
उत्पत्तीस कारण मी मृत्यु मी संहारकात ।
स्मृति कीर्ति मेधा धृति वाचा क्षमा श्री स्त्रियात ॥34॥
सामवेदी बृहत्साम छंदातील गायत्री मी ।
मार्गशीर्ष मासचक्रे ऋतुचक्रे वसंत मी ॥35॥
कपटातील जुगार तेजस्व्यांचे तेज मीच ।
विजय मी मी निश्चय सात्त्विकांचे सत्त्व मीच ॥36॥
यादवांतील श्रीकृष्ण पांडवांत धनंजय ।
मुनींमध्ये व्यास मीच कवींतील शुक्राचार्य ॥37॥

दण्डो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् ।
मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ॥38॥

यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन ।
न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ॥39॥

नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप ।
एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ॥40॥

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥41॥

अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन ।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥42॥

दमनसाधनी दंड विजयेच्छूंची नीति मी ।
रहस्यातील मौन ज्ञात्यांचे ज्ञान जाण मी ॥38॥

संपूर्ण सृष्टीचे बीज ते मीच असे अर्जुना ।
चराचर मजवीण काहीही वस्तु असेना ॥39॥

परंतपा अंत नाही माझ्या दिव्य विभूतींना ।
विस्तार कथिला तुज संक्षेपे जाण या खुणा ॥40॥

विभूति ऐश्वर्यवान कांति शक्ति दयापूर्ण ।
त्या जाण मम तेजाच्या अंशापासून उत्पन्न ॥41॥

विभूति जाणण्या अशा कारण अर्जुना काय ।
जाण व्यापिले मी विश्व अंशे एका धनंजय ॥42॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे
विभूतियोगो नाम दशमोऽध्याय: ॥ 10 ॥

# अथैकादशोऽध्यायः ।

# विश्वरूपदर्शनयोग

अर्जुन उवाच।

मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम् ।
यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम ॥1॥

भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया ।
त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्ययम् ॥2॥

एवमेतद्यथात्थ त्वमात्मानं परमेश्वर ।
द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम ॥3॥

मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो ।
योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम् ॥4॥

अर्जुन म्हणाला ।

उपदेशिले परम अध्यात्म गूढ मजला ।
त्या भाषणे मोह माझा निःशेष नष्ट जाहला ॥1॥

कमलनयना ऐकले विस्तारे उत्पत्ती लय ।
अविनाशी अपार ते ऐकले तव माहात्म्य ॥2॥

कथिले परमेश्वरा स्वमुखे तू स्वस्वरूपा ।
इच्छितो पाहू ऐश्वर्या पुरुषोत्तमा त्या रूपा ॥3॥

प्रभू असेल जर हे पाहणे शक्य मजला ।
योगेश्वरा दाखवा त्या अव्यय तव रूपाला ॥4॥

श्री भगवानुवाच।

पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः ।
नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ॥5॥
पश्यादित्यान्वसून्रुद्रानश्विनौ मरुतस्तथा ।
बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत ॥6॥
इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम् ।
मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥7॥
न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ।
दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥8॥

श्री भगवान म्हणाले ।

पार्था देख माझी आता शतसहस्र रूपे ही ।
अनेक अनेक दिव्य तसे आकार वर्ण ही ॥5॥
आदित्य मरुत रुद्र अश्विनी वसूंना पहा ।
पार्था अपूर्व आश्चर्ये न देखिली तू पहा ॥6॥
एक ठायी सर्व जग गुडाकेशा मम देही ।
चराचरासह पहा इच्छिसी ते आणखीही ॥7॥
असमर्थ पाहण्याला पार्था तुझे चर्मचक्षु ।
योगऐश्वर्य तू पहा देईन मी दिव्यचक्षु ॥8॥

संजय उवाच।

एवमुक्त्वा ततो राजन्महायोगेश्वरो हरिः ।

दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम् ॥9॥

अनेकवक्त्रनयनमनेकाद्भुतदर्शनम् ।

अनेकदिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम् ॥10॥

दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगन्धानुलेपनम् ।

सर्वाश्चर्यमयं देवमनन्तं विश्वतोमुखम् ॥11॥

दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता ।

यदि भाः सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः ॥12॥

संजय म्हणाला ।

हे राजा बोलुनी ऐसे कृष्ण महायोगेश्वर ।

दर्शविता झाला पार्था परम रूप ऐश्वर्य ॥9॥

नाना अद्भुत देखावे अनेक मुखे नेत्रे ती ।

किती अलंकार दिव्य दिव्य शस्त्रे किती किती ॥10॥

माळा वसने ती दिव्य दिव्य गंधाचे लेपन ।

आश्चर्यमय हा देव सर्वव्यापी अंतहीन ॥11॥

उदय सहस्त्र सूर्याचा होता एकाच वेळी ।

त्यासमान कदाचित हरीची ही प्रभावळी ॥12॥

तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा ।
अपश्यद्देवदेवस्य शरीरे पाण्डवस्तदा ॥13॥

ततः स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनंजयः ।
प्रणम्य शिरसा देवं कृताञ्जलिरभाषत ॥14॥

अर्जुन उवाच।

पश्यामि देवांस्तव देव देहे
सर्वांस्तथा भूतविशेषसङ्घान् ।
ब्रह्माणमीशं कमलासनस्थमृषींश्च
सर्वानुरगांश्च दिव्यान् ॥15॥

तेथ एक ठायी जग पूर्ण आणि विभाजीत ।
पांडवे पाहिले देही देवाधिदेवाच्या स्थित ॥13॥

विस्मित चकित असा धनंजय रोमांचित ।
देवास हात जोडून नतमस्तके वदत ॥14॥

अर्जुन म्हणाला ।

देवा पहातो तुझ्याच देही
समुदाय भूते तसेच देव
कमलासनीचा हा ब्रह्मदेव
नागकुळे ऋषि अन विष्णुदेव ॥15॥

अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं

पश्यामि त्वां सर्वतोऽनन्तरूपम् ।

नान्तं न मध्यं न पुनस्तवादिं

पश्यामि विश्वेश्वर विश्वरूप ॥16॥

किरीटिनं गदिनं चक्रिणं च

तेजोराशिं सर्वतो दीप्तिमन्तम् ।

पश्यामि त्वां दुर्निरीक्षं समन्ता

द्दीप्तानलार्क द्युतिमप्रमेयम् ॥17॥

त्वमक्षरं परमं वेदितव्यं

त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।

त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता

सनातनस्त्वं पुरुषो मतो मे ॥18॥

नयन उदर वदने किती

अनेक बाहू रूपे अनंत ती ।

तुला न आदि ना मध्य अंत

विश्वेश्वर विश्वरूपे पहात ॥16॥

गदा चक्र आणि मुकुट शिरी

दीप्ति तेज तुझेच हे मुरारी ।

अग्नि सूर्य सम प्रभ प्रभावी

अमर्याद देवा तुज पाहतो मी ॥17॥

जाणणे तुज तूच ब्रह्म असे

तूच जगाचा आश्रय असे ।

धर्मरक्षक अव्यय शाश्वत

सनातन पुरुष हे मम मत ॥18॥

अनादिमध्यान्तमनन्तवीर्य

मनन्तबाहुं शशिसूर्यनेत्रम् ।

पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं

स्वतेजसा विश्वमिदं तपन्तम् ॥19॥

द्यावापृथिव्योरिदमन्तरं हि

व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः ।

दृष्ट्वाद्‌भुतं रूपमुग्रं तवेदं

लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन् ॥20॥

अमी हि त्वां सुरसङ्घा विशन्ति

केचिद्‌भीताः प्राञ्जलयो गृणन्ति ।

स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसंघाः

स्तुवन्ति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः ॥21॥

आदि मध्य अंत हीन तू वीर

बाहू अनंत चंद्र सूर्य नेत्र ।

तुज मुखी मी अग्नि पाहतो

तेजाने जणु विश्वास जाळतो ॥19॥

आकाश पृथ्वी आणि अंतराळ

व्यापून सर्व दिशाही सकळ ।

अद्‌भूत उग्र देखोनि रूपा

व्याकूळ सर्व जग विश्वरूपा ॥20॥

देवगण सर्व तुझ्यात रिघती

भयभीत होता नमस्कारिती ।

शांतिपाठे महर्षी सिद्धलोक

अर्चिती वदती कल्याणश्लोक ॥21॥

रुद्रादित्या वसवो ये च साध्या
विश्वेऽश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च ।
गन्धर्वयक्षासुरसिद्धसंघा
वीक्षन्ते त्वां विस्मिताश्चैव सर्वे ॥22॥

रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं
महाबाहो बहुबाहूरुपादम् ।
बहूदरं बहुदंष्ट्राकरालं
दृष्ट्वा लोका प्रव्यथितास्तथाहम् ॥23॥

नभ:स्पृशं दीप्तमनेकवर्णं
व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम् ।
दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितान्तरात्मा
धृतिं न विन्दामि शमं न विष्णो ॥24॥

वसू आदित्य रुद्र साध्यगण
विश्वेदेव अश्विनी पितृगण ।
गंधर्वादि असुर सिद्धगण
पाहताति तुजला विस्मयाने ॥22॥

महाबाहो तव विशाल काय
मुखे नयन जंघा हातपाय ।
अनेक दाढा तव रूप भीषण
मज सवे व्याकूळ हे सर्व जन ॥23॥

आकाशस्पर्शी नि अनेकरंगी
तेजस्वी विशाल मुख आणि नेत्र ।
देखोनि हे रूप न राहे धीर
शांती न मज मी गलीतगात्र ॥24॥

दंष्ट्राकरालानि च ते मुखानि

दृष्ट्वैव कालानलसन्निभानि ।

दिशो न जाने न लभे च शर्म

प्रसीद देवेश जगन्निवास ॥25॥

अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः

सर्वे सहैवावनिपालसंघैः ।

भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ

सहास्मदीयैरपि योधमुख्यैः ॥26॥

वक्त्राणि ते त्वरमाणा विशन्ति

दंष्ट्राकरालानि भयानकानि ।

केचिद्विलग्ना दशनान्तरेषु

संदृश्यन्ते चूर्णितैरुत्तमाङ्गैः ॥27॥

विक्राळ दाढा तशाच वदनी

दिसती जणू मृत्युरूप अग्नि ।

दिशा विसरलो वंची सुखास

प्रसन्न मज व्हा जगन्निवास ॥25॥

कौरव सर्व तव मुखी जाती

योद्धे राजेही तेथेच शिरती ।

भीष्म द्रोण कर्ण तसेच जाती

मम वीर योद्धे तेथेच दिसती ॥26॥

अक्राळ विक्राळ तव मुखात

कराल दाढात जाती त्वरेत ।

शीर्षे कुणाची अडकून त्यात

चुरडून तेथे दिसून येत ॥27॥

यथा नदीनां बहवोऽम्बुवेगाः
समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति ।
तथा तवामी नरलोकवीरा
विशन्ति वक्त्राण्यभिविज्वलन्ति ॥28॥
यथा प्रदीप्तं ज्वलनं पतङ्गा
विशन्ति नाशाय समृद्धवेगाः ।
तथैव नाशाय विशन्ति लोका
स्तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः ॥29॥
लेलिह्यसे ग्रसमानः समन्ता
ल्लोकान्समग्रान्वदनैर्ज्वलद्भिः ।
तेजोभिरापूर्य जगत्समग्रं
भासस्तवोग्राः प्रतपन्ति विष्णो ॥30॥

अनेक धारा सरिता वहाती
वेगात त्या सागरातच जाती ।
तसेच योद्धे अन शूरवीर
प्रवेशती तव अग्निमुखद्वार ॥28॥
जसे दीप्त ज्योतीवरी पतंग
झेपावती नाशण्या पूर्ण वेग ।
तसेच नाशास जातात प्राणी
वेगात तव मुखी चक्रपाणी ॥29॥
जळत्या मुखांनी जिभा चाटवीत
गिळल्या जनांना मज दाखवीत ।
सकळ जगाला व्यापून तेजे
विष्णु तुम्ही उग्र दिसता स्वतेजे ॥30॥

आख्याहि मे को भवानुग्ररूपो
नमोऽस्तु ते देव वर प्रसीद ।
विज्ञातुमिच्छामि भवन्तमाद्यं
न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम् ॥31॥

श्री भगवानुवाच।
कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो
लोकान्समाहर्तुमिह प्रवृत्तः ।
ऋतेऽपि त्वां न भविष्यन्ति सर्वे
येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः ॥32॥

उग्ररूप देवा आहात कोण
प्रसन्न व्हा देवा तुम्हा नमन ।
आद्य आपणा जाणू इच्छितो मी
प्रवृत्ति तुमची न जाणतो मी ॥31॥

श्री भगवान म्हणाले ।
महान मी काळ जगाचा संहार
सर्वांच्या नाशा मम अवतार ।
तुजवीण सर्व सकळ योध्यांचा
उभय सैन्यांचा नाश असे साचा ॥32॥

तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व
जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम् ।
मयैवैते निहताः पूर्वमेव
निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥33॥
द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च
कर्णं तथान्यानपि योधवीरान् ।
मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा
युध्यस्व जेतासि रणे सपत्नान् ॥34॥
संजय उवाच।
एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य
कृताञ्जलिर्वेपमानः किरीटि ।
नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं
सगद्गदं भीतभीतः प्रणम्य ॥35॥

म्हणोनि लढ आणि यशास भोग
जिंकूनि शत्रूस राज्यास भोग ।
मी मारिले जाण सर्वा आधीची
निमित्त हो तू अता सव्यसाची ॥33॥
जयद्रथ भीष्म तसेच द्रोण
अनेक वीरांसह तो ही कर्ण ।
मी मारिले या निःशोक मार
लढ जीत आहे तुझी शत्रुवर ॥34॥
संजय म्हणाला ।
केशवाचे बोल हे ऐकता
कंपित किरीटी जोडून हाता ।
भिऊनि नमस्कारास करता
सद्‌गदे कृष्णास झाला बोलता ॥35॥

अर्जुन उवाच।
स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या
जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च ।
रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति
सर्वे नमस्यन्ति च सिद्धसंघाः ॥36॥
कस्माच्च ते न नमेरन्महात्मन्
गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे ।
अनन्त देवेश जगन्निवास
त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ॥37॥
त्वमादिदेवः पुरुषः पुराण
स्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
वेत्तासि वेद्यं च परं च धाम
त्वया ततं विश्वमनन्तरूप ॥38॥

अर्जुन म्हणाला ।
हृषिकेशा तव नामश्रवणे
जगास मिळती हर्षस्फुरणे ।
भयभीत राक्षस ते पळतात
सिद्ध पुरुष तुज नमितात ॥36॥
कां न करिती ते तुज नमन
तू ब्रह्म्याहुन आदि महान ।
देवा जगन्निवासा तू अनंता
सदसत् अक्षय आणि अतीता ॥37॥
तू आदिदेव पुरुषपुराण
तुम्ही जगाचे निवासस्थान ।
ज्ञेय ज्ञाता श्रेष्ठ आश्रयस्थान
अनंत तू राही सृष्टी व्यापून ॥38॥

वायुर्यमोऽग्निर्वरुण: शशाङ्क:
प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ।
नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्व:
पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥39॥

नम: पुरस्तादथ पृष्ठतस्ते
नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ।
अनन्तवीर्यामितविक्रमस्त्वं
सर्वं समानोपि ततोऽसि सर्व: ॥40॥

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं
हे कृष्ण हे यादव हे सखेति ।
अजानता महिमानं तवेदं
मया प्रमादात्प्रणयेन वापि ॥41॥

शशी वरूण अग्नि वायू साचा
प्रजापती तूचि पिताही त्याचा ।
सहस्त्रवेळा नमस्कार आता
पुन्हा पुन्हा मी नमितोचि आता ॥39॥

समोर मागे तुजला नमस्ते
सर्वत्र तू तूचि तुजला नमस्ते ।
अपार समर्थ विक्रमी अमीत
सर्व व्यापी सर्व तुज मी नमीत ॥40॥

मानूनि तुज मित्र अनादराने
कृष्णा सख्या यादवा संबोधने ।
नच जाणता मी तव महिमाने
वदलो तुवा मी चुकि व प्रेमाने ॥41॥

यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि
विहारशय्यासनभोजनेषु ।
एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं
तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ॥42॥

पितासि लोकस्य चराचरस्य
त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ।
न त्वत्समोऽस्त्यभ्यधिक:कुतोऽन्यो
लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभाव ॥43॥

तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं
प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ।
पितेव पुत्रस्य सखेव सख्यु:
प्रिय: प्रियायार्हसि देव सोढुम् ॥44॥

अच्युता तुज एकांती शयनी
खेळता बैठकी किंवा भोजनी ।
देखता बोललो जे अपमाना
अमीता क्षमा मज ही प्रार्थना ॥42॥

तूचि पिता चराचर लोकांचा
तूचि पूज्य गुरु आद्य जगाचा ।
तुजवीण ना कोणी वा आधिकाचा
असेल का या त्रिलोकी साचा ॥43॥

म्हणोनि तुम्हा प्रणिपातितो मी
कृपा याचितो पूज्य देवा तुम्हा मी ।
पिता सुताला सखा वा सख्याला
प्रिय प्रियाला तेचि देवा आम्हाला ॥44॥

अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा
भयेन च प्रव्यथितं मनो मे ।
तदेव मे दर्शय देव रूपं
प्रसीद देवेश जगन्निवास ॥45॥
किरीटिनं गदिनं चक्रहस्त
मिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ।
तेनैव रूपेण चतुर्भुजेन
सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥46॥
श्री भगवानुवाच।
मया प्रसन्नेन तवार्जुनेदं
रूपं परं दर्शितमात्मयोगात् ।
तेजोमयं विश्वमनन्तमाद्यं
यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम् ॥47॥

न पाहिल्या पाहुनि हर्षलो मी
भयाने परंतु व्याकूळलो मी ।
पहिलेच देवा ते रूप दावा
जगन्नियंत्या व्हा प्रसन्न देवा ॥45॥
सहस्त्रबाहू विश्वरूपा तुझी ती
मुकुट गदा चक्र तव हाती ।
तशीच चतुर्भुज रूप मूर्ती
मी इच्छी पाहू कराच पूर्ती ॥46॥
श्री भगवान म्हणाले ।
तुझ्यावरी होउनि मी प्रसन्न
सामर्थ्य योगे दिधले दर्शन ।
अनंत आद्य तेजस्वि विश्व
तू एकला देखिले अपूर्व ॥47॥

न वेदयज्ञाध्ययनैर्न दानैर्न
च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः ।
एवंरूपः शक्य अहं नृलोके
द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर ॥48॥

मा ते व्यथा मा च विमूढभावो
दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदम् ।
व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं
तदेव मे रूपमिदं प्रपश्य ॥49॥

संजय उवाच।
इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा
स्वकं रूपं दर्शयामास भूयः ।
आश्वासयामास च भीतमेनं
भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा ॥50॥

ना वेदाच्या अभ्यासे वा दानाने
ना पुण्यकर्माने अथवा तपाने ।
अशक्य मज ये लोकी पहाणे
कुरुप्रवीरा कोणा तुझियाविणे ॥48॥

नको काकुळी तू नको भ्रांतचित्त
पाहून हे रूप नको व्यथीत ।
भयमुक्त आणि हो प्रीतियुक्त
पुन्हा पहा मज पूर्वरूपयुक्त ॥49॥

संजय म्हणाला ।
अर्जुनाला बोलले वासुदेव
त्या दाविले आपुले रूप पूर्व ।
सौम्य स्वरूपात येऊनि आता
आश्वस्त केले भयभीत पार्था ॥50॥

अर्जुन उवाच।

दृष्ट्‌वेदं मानुषं रूपं तव सौम्यं जनार्दन ।

इदानिमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः ॥51॥

श्री भगवान उवाच।

सुदुर्दशमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम ।

देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकाङ्‌क्षणः ॥52॥

नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया।

शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा ॥53॥

भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ।

ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥54॥

मत्कर्मकृन्मत्परमो मद्‌भक्तः सङ्गवर्जितः ।

निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव ॥55॥

अर्जुन म्हणाला ।

देखोनी तव हे रूप सौम्य मानवी श्रीकृष्णा ।

आता स्वस्थ चित्त मज सावधान मी कृष्णा ॥51॥

श्री भगवान म्हणाले ।

दुर्लभ हे माझे रूप पाहिलेस तू अर्जुना ।

नित्य यत्न करिती देव सदा उत्सुक दर्शना ॥52॥

करूनि यज्ञ अथवा वेदपाठ दान तप ।

दिसण्यास नाही शक्य माझे असे मूळ रूप ॥53॥

परी अनन्य भक्तीने जाणणे अर्जुना मज ।

पाहणे नि लीन होणे परंतपा शक्य हे तुज ॥54॥

संसारसंग सोडून कर्मे मज अर्पितो ।

सर्वभूती निर्वैर भक्त तो मज पावतो ॥55॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे
विश्वरूपदर्शनयोगो नामैकादशोध्यायः ॥ 11 ॥

# अथ द्वादशोध्यायः

# भक्तियोग

अर्जुन उवाच।

एवं सतत युक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते।
ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ॥1॥

श्री भगवान उवाच ।

मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्तमा मताः ॥2॥

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ।
सर्वत्रगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥3॥

संनियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहितेरताः ॥4॥

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥5॥

अर्जुन म्हणाला

असे सदैव तुजसी मिळून भजती योगी ।
अव्यक्तासी उपासिती कोणता श्रेष्ठ योगी ॥1॥

श्री भगवान म्हणाले ।

मज ठायी मन ठेवी मज नित्यचि उपासी ।
दिव्य श्रद्धा मजवरी योगी उत्तम जाणसी ॥2॥

परंतु इंद्रियापार अव्यक्त अमर्याद जे ।
सर्वव्यापी अचल स्थिर अचिंत्यासि भजे ॥3॥

इंद्रियांना संयमून सर्वांना सम पाहती ।
सर्वांच्या हिताला झटे ते ही मजसी पावती ॥4॥

अव्यक्त ब्रह्म उपासना कष्टाची ही साधना ।
दु:खी देहधारी होती ही करिता उपासना ॥5॥

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ॥6॥
तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि नचिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥7॥
मय्येव मन आधस्व मयि बुद्धिं निवेशय ।
निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥8॥
अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ।
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ॥9॥
अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि ॥10॥

परंतु अर्पुनी कर्मे सर्व मजसी रत ।
अनन्य भावाने ध्यान माझे मज उपासत ॥6॥
भवसागरातून त्यांचा तारणहार मी ।
विनाविलंबाने त्यांना पार्था उद्धरतो मी ॥7॥
मन आणि बुद्धि तुझी मजपाशी ठेव स्थिर ।
नि:संदेह माझ्यामध्ये निवास तदनंतर ॥8॥
जरी स्थिरावणे मना न च जमेल तुजला ।
इच्छा वाढवी अभ्यासे प्राप्त करण्या मजला ॥9॥
अभ्यासही न होईल कर्मे कर मजसाठी ।
पूर्ण सिद्धि तुज प्राप्त केल्या कर्मे मजसाठी ॥10॥

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।
सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥11॥
श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।
ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥12॥
अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥13॥
संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ॥14॥
यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।
हर्षामर्षभयोव्देगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥15॥

कर्म समर्पण जर कठीण गमते तुजला ।
आत्मस्थित राहून त्याग मात्र कर्मफला ॥11॥
अभ्यासाहूनही ज्ञान ध्यान त्याच्याही वर ।
कर्मफळत्याग त्याहून या त्यागे शांति निरंतर ॥12॥
अद्वेषी सर्वांठायी दया मैत्र क्षमाशील ।
ममत्व अहंता नाही सुख दुःखा सम पाहील ॥13॥
निरंतर समाधानी संयमी ज्या दृढनिश्चय ।
मन बुद्धि मजवरी असा भक्त मज प्रिय ॥14॥
ज्याचा लोका न कंटाळा लोके उद्विग्न न होय ।
चिंता भय दुःख राग मुक्त यातून मज प्रिय ॥15॥

अनपेक्ष शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।
सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥16॥

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति ।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः ॥17॥

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।
शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः ॥18॥

तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित् ।
अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥19॥

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ।
श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥20॥

निरपेक्ष नि पवित्र उदासीन दुःखमुक्त ।
अहं त्यागी कार्यारंभाचा प्रिय मज तो भक्त ॥16॥

हर्ष नाही शोक नाही द्वेष नाही इच्छा नसे ।
शुभ अशुभा त्यागी तो भक्त मज प्रिय असे ॥17॥

शत्रु मित्र सारखेच मानापानही नसे ।
शीत उष्ण सुख दुःख सम आसक्ति नसे ॥18॥

स्तुती निंदा एक ज्याला मौनव्रती तुष्ट सदा ।
विश्वचि ज्याचे घर ज्ञानी भक्त प्रिय सर्वदा ॥19॥

जे असे धर्माचे अमृत ऐकोनी आचरतात ।
श्रद्धेने माझे भक्त मज प्रिय सर्वातीत ॥20॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे
भक्तियोगो नाम द्वादशोऽध्यायः ॥ 12 ॥

# अथ त्रयोदशोध्याय:

# क्षेत्रक्षेत्रज्ञविभाग योग

अर्जुन उवाच।

प्रकृतिं पुरुषं चैव क्षेत्रक्षेत्रज्ञमेव च ।

एतद्वेदितुमिच्छामि ज्ञानं ज्ञेय च केशव ॥1॥

श्री भगवान उवाच।

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते ।

एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ॥2॥

क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ।

क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥3॥

तत्क्षेत्रं यच्च यादृक्च यद्विकारि यतश्च यत् ।

स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे श्रुणु ॥4॥

ऋषिभिर्बहुधा गीतं छन्दोभिर्विविधैः पृथक् ।

ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्‌भिर्विनिश्चितैः ॥5॥

अर्जुन म्हणाला ।

प्रकृति पुरुष आणि क्षेत्र क्षेत्रज्ञ कोण तो ।

ज्ञान ज्ञेय काय असे केशवा जाणु इच्छितो ॥1॥

श्रीभगवान म्हणाले ।

कौंतेया या शरीराला क्षेत्र ऐसे जाणताती ।

जाणतो हे जो त्यालाच क्षेत्रज्ञ बुध सांगती ॥2॥

क्षेत्रातील क्षेत्रज्ञ जो तो मीच हे जाण असे ।

क्षेत्रक्षेत्रज्ञाचे ज्ञान तेच ज्ञान मम मत असे ॥3॥

ते क्षेत्र स्वरूप त्याचे निर्मिती आणि विकार ।

क्षेत्रज्ञ त्याचा प्रभाव संक्षेपे श्रवण कर ॥4॥

ऋषींनी मंथिले हेच ग्रंथांतरी हे वर्णिले ।

ब्रह्मसूत्रांतून आणि पंडितांनी सांगितले ॥5॥

महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च ।
इन्द्रियाणि दशैकं च पञ्च चेन्द्रियगोचराः ॥6॥
इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः ।
एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥7॥
अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् ।
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥8॥
इन्द्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च ।
जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम् ॥9॥
असक्तिरनभिष्वङ्गः पुत्रदारगृहादिषु ।
नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ॥10॥

महाभूते अहंकार बुद्धि अव्यक्त प्रकृति ।
दहा इंद्रिये मन पाच इंद्रियविषय ॥6॥
इच्छा द्वेष सुख दुःख चेतना धैर्य समूह ।
संक्षेपे क्षेत्र हे जाण यांच्या विकारासह ॥7॥
अदंभ नम्रता अवक्र अहिंसा नि सहिष्णुता ।
चित्तशुद्धि गुरुसेवा आत्मसंयम स्थिरता ॥8॥
इंद्रियभोगा वैराग्य अहंकाराचा अभाव ।
जन्म वृद्धत्व मृत्यू रोग दोषांची जाणीव ॥9॥
आसक्ति नाही ना लौल्य स्त्री पुत्रा निवासाप्रती ।
इष्ट वा अनिष्ट होता समतोल राखी चित्ती ॥10॥

मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ।
विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥11॥

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥12॥

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वामृतमश्नुते ।
अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥13॥

सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।
सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥14॥

सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम् ।
असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥15॥

एकांती निवास भक्ति अनन्यत्वे मजप्रति ।
साधारण लोकांमध्ये राहण्या त्या अनासक्ति ॥11॥

अध्यात्मज्ञानचि नित्य तत्त्वार्थ ब्रह्मदर्शन ।
हेच ज्ञान असे जाण यापरते ते अज्ञान ॥12॥

ज्ञेय जे मी सांगतो अमृतत्वा जाती जाणते ।
अनादि परब्रह्म ते ना असते व नसते ॥13॥

हात पाय त्या सर्वत्र तसे डोळे शिर आनन ।
सगळीकडे त्यास कान विश्वात सर्व व्यापून ॥14॥

इंद्रियगुणांनी दिसे परी इंद्रियापार ते ।
निरासक्त सर्वाधार निर्गुणी गुणा भोगते ॥15॥

बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च ।
सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत् ॥16॥
अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम् ।
भूतभर्तु च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च ॥17॥
ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते ।
ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम् ॥18॥
इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः ।
मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ॥19॥
प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादि उभावपि ।
विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥20॥

चराचर प्राणिमात्री अंतर्बाह्य ते असते ।
न कळे त्याच्या सूक्ष्मत्वे दूर नि समीप असते ॥16॥
जीवमात्रे विभागले तरी सर्वत्र एकच ।
जीवांना पाळिते जाण निर्माण नाश करी तेच ॥17॥
ते तेज तेजाचेही अंधारापार ते जाण ।
जे जाणणे ज्ञानाने ज्ञेय सर्व चित्ती जाण ॥18॥
क्षेत्र ज्ञान ज्ञेय असे संक्षेपे कथिले तुज ।
जाणुनि हे मम भक्त पावतो येऊनि मज ॥19॥
प्रकृति आणि पुरुष दोन्हीही अनादि ख्यात ।
विकार गुणही तीन प्रकृतीपासून होत ॥20॥

कार्यकरणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ॥21॥

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान् ।
कारणं गुणसङ्गोऽस्य सदसद्योनिजन्मसु ॥22॥

उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः ।
परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ॥23॥

य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह ।
सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते ॥24॥

ध्यानेनात्मनि पश्यन्ति केचिदात्मानमात्मना ।
अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ॥25॥

कार्य कारण कर्तृत्वा प्रकृति होय कारण ।
सुख दुःखे भोगण्याला पुरुष हाच कारण ॥21॥

प्रकृतीच्या त्रिगुणांनी पुरुष भोगा भोगतो ।
तिच्याच गुणसंगाने अनेक जन्मा पावतो ॥22॥

साक्षी शासक स्वामी उपभोगी परमेश्वर ।
देही दिव्य पुरुष तो परमात्मा खरोखर ॥23॥

जो हे जाणतो पुरुष गुणांकित प्रकृतीला ।
संसारी जरी तो रत न मिळे पुनर्जन्माला ॥24॥

कोणी अंतरी स्वतःच्या परमात्मा ध्याने पाहती ।
काही सांख्ययोगाने वा कर्मयोगे त्या पाहती ॥25॥

अन्ये त्वेवमजानन्तः श्रुत्वान्येभ्य उपासते ।
तेऽपि चातितरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥26॥
यावत्संजायते किंचित्सत्त्वं स्थावरजङ्गमम् ।
क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ ॥27॥
समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्त परमेश्वरम् ।
विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति ॥28॥
समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।
न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ॥29॥
प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः ।
यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ॥30॥

अजाण सश्रद्ध कोणी श्रवणाने उपासती ।
उपदेशा आदरती जन्म मृत्यू निवारती ॥26॥
चराचर वस्तुजात यांचे उत्पत्ती कारण ।
क्षेत्र क्षेत्रज्ञ संयोग भरतश्रेष्ठा तू जाण ॥27॥
सर्वभूती समानत्वे परमेश्वराचा वास ।
नश्वरातील अविनाशी जाणतो तोचि डोळस ॥28॥
सारखाचि सर्व जगी राहे ईश्वर पाहतो ।
तो न जातो अधोगती तो श्रेष्ठ गति पावतो ॥29॥
प्रकृतीकडूनीच ती कर्मे होती सर्व जाण ।
आत्मा अकर्ता राही पाहे हे तो ज्ञानी जाण ॥30॥

यथा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति ।
तत एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा ॥31॥
अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः ।
शरीरस्थोऽपि कौन्तेय न करोति न लिप्यते ॥32॥
यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते ।
सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ॥33॥
यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमंरविः ।
क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ॥34॥
क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा ।
भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम् ॥35॥

सर्व भूते अनेकविध एक आत्म्याशी तद्रूप ।
त्याचा विस्तार हे जाणे पुरुष पावे ब्रह्मरूप ॥31॥
हा परमात्मा अव्यय अनादि निर्गुण असे ।
न काही करी अलिप्त कौंतेया जरी देही वसे ॥32॥
जरी सर्वत्र आकाश त्यास नसे काही पाश ।
तसा आत्मा सर्व देही तरी त्याला नसे पाश ॥33॥
प्रकाश देई सर्व जगा जसा सूर्य भारता ।
चेतनेने प्रकाशे देहा क्षेत्रज्ञ आत्मा एकटा ॥34॥
ज्ञानदृष्टीने जाणती क्षेत्रक्षेत्रज्ञ भेद ।
जीव प्रकृती मोक्षा जे पावतात ब्रह्मपद ॥35॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे
क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगो नाम त्रयोदशोऽध्याय: ॥ 13 ॥

# अथ चतुर्दशोध्याय:

# गुणत्रयविभागयोग

श्री भगवान उवाच।

परं भूयः प्रवक्षामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् ।
यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः ॥1॥
इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ।
सर्गेऽपि नोपजायन्ते प्रलये न व्यथन्ति च ॥2॥
मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् ।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥3॥
सर्वयोनिषु कौन्तेय मूर्तयः संभवन्ति याः ।
तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥4॥

श्रीभगवान म्हणाले।

पुन्हा मी कथितो दिव्य श्रेष्ठ ज्ञान ज्ञानांतले ।
जे जाणूनि मुनी सर्व परम सिद्धि पावले ॥1॥
हे ज्ञान मिळवून जे माझ्या स्वरूपी येती ।
ना जन्मती सृष्टीआरंभी ना प्रलयांती मरती ॥2॥
महद्ब्रह्म माया योनी ही देतो मी गर्भ तेथ ।
सर्व भूतांची उत्पत्ती त्यातून होते भारत ॥3॥
देह सर्व योनीत प्रकट होती कौंतेया ।
त्या सर्वांचा मी पिता माता ही प्रकृतिमाया ॥4॥

सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः ।
निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥5॥
तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम् ।
सुखसङ्गेन बध्नाति ज्ञानसङ्गेन चानघ ॥6॥
रजो रागात्मकं विद्धि तृष्णासङ्गसमुजवम् ।
तन्निबध्नाति कौन्तेय कर्मसङ्गेन देहिनम् ॥7॥
तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् ।
प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥8॥
सत्त्वं सुखे संजयति रजः कर्मणि भारत ।
ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे संजयत्युत ॥9॥

सत्त्व रज तम गुण प्रकृतीतून होतात ।
गुण बांधती जीवाला अविनाशी जो देहात ॥5॥
तेथे निष्पाप निर्मळ प्रकाशमय सत्त्वगुण ।
त्यास गमे मी सुखी ज्ञानी त्या पाशे जाण बंधन ॥6॥
इच्छा तृष्णेमुळे जाण उद्‌भवतो रजोगुण ।
तो बांधतो कौंतेया देहधाऱ्यास कर्माने ॥7॥
प्राण्यांचा मोह तो जाण अज्ञाने जन्मला तम ।
दुराचार निद्रा आळस पाश हे बांधतात ॥8॥
सुखपाशे सत्त्वगुण कर्मपाशे रजोगुण ।
ज्ञान झाकून मूर्खत्वे बांधे नरा तमोगुण ॥9॥

रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत ।
रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा ॥10॥

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते ।
ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत ॥11॥

लोभः प्रवृत्तिरारम्भः कर्मणामशमः स्पृहा ।
रजस्येतानि जायन्ते विवृद्धे भरतर्षभ ॥12॥

अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च ।
तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनन्दन ॥13॥

यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् ।
तदोत्तमविदां लोकानमलान्प्रतिपद्यते ॥14॥

रज तमाला जिंकून सत्त्वा प्रामुख्य भारता ।
सत्त्व तमा जिंके रज वा तम कधी रज सत्त्वा ॥10॥

इंद्रिये सर्व देहाची प्रकाशती विकसती ।
जेव्हा ज्ञाने जाण तेव्हा सत्त्ववृद्धीच म्हणती ॥11॥

विषयी लालसा लोभ इच्छा कर्म आरंभाची ।
लक्षणे भरतर्षभा जाण ही रजोगुणाची ॥12॥

मोह प्रमाद आदि आळस आणि अज्ञान ।
तमोगुणाने उत्पन्न हे जाण कुरुनंदन ॥13॥

सत्त्वगुण वाढताना मृत्यु येता मनुष्याला ।
त्यास जन्म महर्षींच्या ज्ञानी शुद्ध लोकाला ॥14॥

रजसि प्रलयं गत्वा कर्मसङ्गिषु जायते ।
तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ॥15॥
कर्मणः सुकृतस्याहुः सात्त्विकं निर्मलं फलम् ।
रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम् ॥16॥
सत्त्वात्सन्जायते ज्ञानं रजसो लोभ एव च ।
प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ॥17॥
ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः ।
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥18॥
नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति ।
गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ॥19॥

रजोगुणी देह त्यागे आसक्त मानवजन्म ।
तमात सोडल्या देह पशू वृक्षादीत जन्म ॥15॥
पुण्यकर्मामुळे प्राप्त सात्त्विक निर्मळ फळ ।
राजस कर्माचे दुःख तमाचे अज्ञान फळ ॥16॥
सत्त्वाने उद्भवे ज्ञान रजाने लोभ जनन ।
तम उद्भवतो मोह प्रमाद आणि अज्ञान ॥17॥
स्वर्गलोकी सात्त्विक जाती रजोगुणी पृथ्विलोकी ।
अवगुणी तामसी जे जाती पाताळलोकी ॥18॥
द्रष्टा ज्यास दिसे स्पष्ट गुणावीण ना दुजा कर्ता ।
परमात्मा गुणातीत जाणे तो मज पावतो ॥19॥

गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान् ।

जन्ममृत्युजरादु:खैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ॥20॥

अर्जुन उवाच।

कैर्लिङ्गैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो ।

किमाचार: कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते ॥21॥

श्री भगवानुवाच।

प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पाण्डव ।

न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि काङ्क्षति ॥22॥

तो जातो पार त्रिगुणांच्या जे कारण देहास ।

जन्म मृत्यु जरा दु:ख सुटे पावतो मोक्षास ॥20॥

अर्जुन म्हणाला ।

कोणती लक्षणे त्याची त्रिगुणातीत जो असे ।

आचार काय त्याचा त्रिगुणा उल्लंघी कसे ॥21॥

श्रीभगवान म्हणाले ।

त्रिगुणाचे जे कार्य प्रकाश प्रवृत्ती मोह ।

पावता न तिरस्कारी न मिळता नसे स्पृहा ॥22॥

उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते ।
गुणा वर्तन्त इत्येव योऽवतिष्ठति नेङ्गते ॥23॥
समदु:खसुख: स्वस्थ: समलोष्टाश्मकाञ्चन: ।
तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिन्दात्मसंस्तुति: ॥24॥
मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयो: ।
सर्वारम्भपरित्यागी गुणातीत: स उच्यते ॥25॥
मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।
स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥26॥
ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च ।
शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च ॥27॥

उदासीन राहतो जो गुणप्रभावे न चळे ।
गुणाचे काम गुण करी जाणोनी न विचले ॥23॥
सुख दु:ख सम त्यास दगड माती वा सोने ।
समान प्रिय अप्रिय निंदा स्तुति त्या समान ॥24॥
मान अपमान सम शत्रु मित्र सम देखे ।
कर्म आरंभ त्यागी तोचि गुणातीत ओळख ॥25॥
एकनिष्ठ भक्तियोगे जो मजला उपासतो ।
तो गुणातीत होऊन ब्रह्मपदास पावतो ॥26॥
मी अविकारी शाश्वत ब्रह्माचा आधार मीच ।
आनंदमय अमर्त्य धर्मस्वरूप ब्रह्म मीच ॥27॥

ॐ तत्सदिति श्रीमद्‌भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे
गुणत्रयविभागयोगो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ 14 ॥

# अथ पञ्चदशोध्यायः

# पुरुषोत्तमयोग

श्री भगवानुवाच।

ऊर्ध्वमूलमध:शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।

छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥1॥

अध:श्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा

गुणप्रवृद्धा विषयप्रवाला ।

अधश्च मूलान्यनुसंततरनि

कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके ॥2॥

न रूपमस्येह तथोपलभ्यते

नान्तो न चादिर्न च संप्रतिष्ठा ।

अश्वत्थमेनं सुविरूढमूलम

सङ्गशस्त्रेण दृढेन छित्वा ॥3॥

श्रीभगवान म्हणाले ।

मूळ वर शाखा खाली अश्वत्थ तरी अव्यय ।

वेदपर्णे ज्या वृक्षाला त्या जाणतो तो वेदज्ञ ॥1॥

त्रिगुण वाढविती या वृक्षाला

विषय पल्लवे शाखा याला

खालती होय विस्तार मुळांचा

कर्माआधीन मनुष्यलोकाचा ॥2॥

स्वरूप याचे न कळे यथार्थ

या आदि ना अंत आधार येथ

दृढमूल हा जाणुनि अश्वत्थ

छेदूनिया त्यास असंगशस्त्रे ॥3॥

ततः पदं तत्परिमार्गितव्यं
यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः ।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये
यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥4॥
निर्मानमोहा जितसङ्गदोषा
अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ।
द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञै
र्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत् ॥5॥
न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः ।
यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥6॥

शोधावे स्वरूपी पद स्थान
नाही परतणे जाता तेथून
उद्भव प्रसार जगा जेथून
जावे त्या आदिपुरुषा शरण ॥4॥
मोहहीन असंगातून मुक्त
नित्य स्वरूपी अध्यात्मी स्थित
सुखदु:खाच्या द्वंद्वातून मुक्त
तो ज्ञानी शाश्वत पदास प्राप्त ॥5॥
सूर्य चंद्र अग्नि नच त्या पदास प्रकाशती ।
ते माझे परमधाम जाता कुणी न परतती ॥6॥

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।
मनः षष्ठानिन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥7॥
शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ।
गृहीत्वैतानि संयाति वायुर्गन्धानिवाशयात् ॥8॥
श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च ।
अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ॥9॥
उत्क्रामन्तं स्थितं वापि भुञ्जानं वा गुणान्वितम् ।
विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः ॥10॥
यतन्तो योगिनश्चैनं पश्यन्त्यात्मन्यवस्थितम् ।
यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यन्त्यचेतसः ॥11॥

माझा अंश सर्व जगी जीवरूपी सनातन ।
तोच स्वत:सवे नेई पंचेंद्रिय आणि मन ॥7॥
शरीरा धारी वा त्यागी जीव हा ईश त्या वेळा ।
गात्रे नेई स्वत:संगे जसा वायू परिमळा ॥8॥
कान डोळे त्वचा जिव्हा आणि नासिका या संगे ।
मना अंगिकारून जीव तेथ विषयास भोगे ॥9॥
देह त्यागे, देही असता किंवा त्रिगुणांनी युक्त ।
अज्ञान्यास न दिसे आत्मा पाही ज्ञानचक्षुयुक्त ॥10॥
योगी प्रयत्ने आत्म्यास आत्मस्थानीच पाहती ।
वैराग्य ज्ञान ज्या नसे ते यत्नेही न देखती ॥11॥

यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ।
यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥12॥
गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा ।
पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः ॥13॥
अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ।
प्राणापानसमायुक्तःपचाम्यन्नं चतुर्विधम् ॥14॥
सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो
मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो
वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ॥15॥

जे तेज आहे सूर्याचे ज्याने जग प्रकाशते ।
चंद्र वा अग्नी ठायी जे मजपासून तेजाळते ॥12॥
मम शक्तीने धारी जीवा पृथ्वीत प्रवेशुन मी ।
रसरूपी चंद्र होऊन औषधी पोषितो मी ॥13॥
जठराग्नी जाण मीच प्राण्यांच्या देही राहून ।
प्राण अपान संयोगे चतुर्विध पचवी अन्न ॥14॥
मीच हृदयी सर्वांच्या रहातो
स्मृति विस्मृती ज्ञान ही त्यां देतो
वेदातुनी जाणणे मजसीच
मी वेदकर्ता त्या जाणतो मीच ॥15॥

द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥16॥
उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥17॥
यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ।
अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥18॥
यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम् ।
स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ॥19॥
इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ।
एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ॥20॥

या जगी पुरुष दोन क्षर तसेच अक्षर ।
मायामय चैतन्य ते अक्षर भूत जाण क्षर ॥16॥
दोघाहून वेगळा तो उत्तम पुरुष आहे ।
अव्यय ईश परमात्मा त्रिलोका पोषताहे ॥17॥
क्षरापार अक्षरापर मी दिव्य उत्तम ।
जगी वेदांतही मीच प्रसिद्ध पुरुषोत्तम ॥18॥
जो ज्ञानी निःसंदेह मी पुरुषोत्तम जाणतो ।
तो सर्वज्ञ तो मज भक्तिभावे सदा भजतो ॥19॥
हे गुह्यात गुह्य शास्त्र कथिले पापरहिता ।
जाणल्या बुद्धिमंत होई कृतकृत्य भारता ॥20॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां

योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे

पुरुषोत्तमयोगो नाम पञ्चदशोऽध्यायः॥ 15 ॥

# अथ षोडशोऽध्याय:
# दैवासुरसंपद्विभागयोग

श्री भगवानुवाच।

अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।
दानं दमश्च यज्ञश्च स्वध्यायस्तप आर्जवम् ॥1॥
अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम् ।
दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं हीरचापलम् ॥2॥
तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।
भवन्ति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥3॥
दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ।
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥4॥

श्रीभगवान म्हणाले ।

निर्भयता सत्त्वशुद्धि ज्ञान योगात जीवन ।
संयम तप सौजन्य दान यज्ञ अध्ययन ॥1॥
अक्रोध अहिंसा सत्य त्याग शांति अपैशुन ।
दया जीवा लोभमुक्ति सौम्यता लाज अचापल्य ॥2॥
उत्साह क्षमा पावित्र्य, अपेक्षा द्रोह नसणे ।
आणि धैर्य या संपदा भारता दैवी जाणणे ॥3॥
अहंता क्रौर्य उद्धत्व गर्व आणि उग्रपण ।
तसेच अज्ञान पार्था आसुरी संपत्ति जाण ॥4॥

दैवी संपद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता ।
मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पाण्डव ॥5॥

द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च ।
दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे श्रृणु ॥6॥

प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः ।
न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ॥7॥

असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ।
अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥8॥

एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः ।
प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ॥9॥

दैवी संपत्ति मोक्षास बंधनास ती आसुरी ।
शोक नको पांडवा तू जन्मला दैवी गुणधारी ॥5॥

जीवाचे प्रकार दोन दैवी आसुरी ते जाण ।
दैवी कथिले विस्तारे पार्थ आसुरी कथीन ॥6॥

पुण्ये प्रवृत्ती निवृत्ती पापा न आसुरी जाणत ।
पावित्र्य सदाचार वा सत्य नाहीच त्यांच्यात ॥7॥

धर्माधार नाही नाही ईश्वर जग असत् ।
मैथुनाविना जगाला कारण नाही मानतात ॥8॥

या मता अंगिकारून अल्पबुद्धि ते आत्महत ।
रिपु जगाचे उग्रकर्मी नाशाला कारणीभूत ॥9॥

काममाश्रित्य दुष्पूरं दम्भमानमदान्विताः ।
मोहाद्गृहीत्वासद्ग्राहान्प्रवर्तन्तेऽशुचिव्रताः ॥10॥
चिन्तामपरिमेयां च प्रलयान्तामुपाश्रिताः ।
कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः ॥11॥
आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ।
ईहन्ते कामभोगार्थमन्यायेनार्थसञ्चयान् ॥12॥
इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ।
इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ॥13॥
असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि ।
ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी ॥14॥

अतृप्त कामातूर मानी मदाने धुंद दांभिक ।
मोहे दुराग्रहाने ते पापाचरणास उत्सुक ॥10॥
चिंता भय अपार यांना मरणांतीही राहते ।
कामभोग हेच श्रेष्ठ हेच बोलती निश्चिते ॥11॥
आशाळभूत सदैव कामक्रोधी बुडालेले ।
कामतृप्तीस्तव अन्याये द्रव्यसंचया भुकेले ॥12॥
"हे आज मिळविले मी इच्छितो मी अधिक ।
मजपाशी धन आहे होईल धन अधिक ॥13॥
हा शत्रू मी मारिला बाकी शत्रूस मारीन ।
ईश्वर भोक्ता सुखी मी सिद्ध आणि बलवान ॥14॥

आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया ।
यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिता: ॥15॥

अनेकचित्तविभ्रान्ता मोहजालसमावृता: ।
प्रसक्ता: कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ ॥16॥

आत्मसंभाविता: स्तब्धा धनमानमदान्विता: ।
यजन्ते नामयज्ञैस्ते दम्भेनाविधिपूर्वकम् ॥17॥

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिता: ।
मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयका: ॥18॥

तानहं द्विषत: क्रूरान्संसारेषु नराधमान् ।
क्षिपाम्यजस्त्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥19॥

धनवान कुलीन मी मजसम अन्य कोण । यज्ञ दाने
संतोषीन" अशा अज्ञाने मोहून ॥15॥

भ्रांत कल्पनांनी ग्रस्त मोह जाली अडकले ।
विषयभोगात आसक्त जाण ते नरकी गेले ॥16॥

उद्धट अहंमन्य ते गर्विष्ठ धनामानाने ।
नाममात्र विधीहीन यज्ञा करिती दंभाने ॥17॥

काम क्रोध बल गर्वाने आसुरी ते मोहाने ।
त्यांच्या नि सर्वांच्या देही स्थित मज निंदती द्वेषाने ॥18॥

मजप्रति द्वेषग्रस्त क्रूर नराधम ते ।
त्यां टाकतो अमंगळ आसुरी जन्मयोनीत ॥19॥

आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि ।

मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम् ॥20॥

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।

कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं यजेत् ॥21॥

एतैर्विमुक्तः कौन्तेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः ।

आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् ॥22॥

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।

न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥23॥

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।

ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥24॥

कौंतेया आसुरी योनीत पुन्हा पुन्हा ते जन्मती ।

मजसी न प्राप्त होती पावती अधम गती ॥20॥

तीन द्वारे नरकासाठी आत्म्याच्या विनाशास्तव ।

काम क्रोध आणि लोभ त्रिपुटी योग्य त्यागास्तव ॥21॥

तमाच्या या तीन दारी त्रिपुटीतून जो सुटतो ।

साधतो आत्मकल्याण परमगती पावतो ॥22॥

शास्त्राच्या रीती सोडून स्वैर कामाने वर्तती ।

त्यांना ना सिद्धि मिळते ना सुख ना परा गती ॥23॥

म्हणून शास्त्र प्रमाण जाणण्या कर्तव्याकर्तव्य ।

कर्म शास्त्रानुसारचि करणे तुज कर्तव्य ॥24॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां

योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे

दैवासुरसंपद्विभागयोगो नाम षोडशोऽध्यायः ॥ 16 ॥

# अथ सप्तदशोध्याय:

# श्रद्धात्रयविभागयोग

अर्जुन उवाच।

ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विताः ।
तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्त्वमाहो रजस्तमः ॥1॥

श्री भगवानुवाच।

त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा ।
सात्त्विकी राजसी चैव तामसी चेति तां शृणु ॥2॥

सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत ।
श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥3॥

यजन्ते सात्त्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः ।
प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजन्ते तामसा जनाः ॥4॥

अर्जुन म्हणाला ।

हे कृष्णा श्रद्धेने जे पूजती सोडून शास्त्रास ।
या निष्ठेने कोठे जाती सत्त्व रज का तमास ॥1॥

श्रीभगवान म्हणाले ।

त्रिविध श्रद्धा असते स्वभावे अशा जगती ।
सात्त्विक राजस आणि तामस ऐक कशी ती ॥2॥

सत्त्व ज्याचे जसे असे तशीच श्रद्धा भारत ।
श्रद्धामय तसा पुरुष जशी श्रद्धा भारत ॥3॥

सात्त्विक देवास पूजती राजस यक्ष राक्षस ।
भूतप्रेत आदींना ते पूजतात तामस ॥4॥

अशास्त्रविहितं घोरं तप्यन्ते ये तपो जनाः ।
दम्भाहंकारसंयुक्ताः कामरागबलान्विताः ॥5॥
कर्षयन्तः शरीरस्थं भूतग्राममचेतसः ।
मां चैवान्तः शरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान् ॥6॥
आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः ।
यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं श्रृणु ॥7॥
आयुःसत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ।
रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ॥8॥
कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः ।
आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥9॥

अहंता दांभिकतेने आसक्ति अभिलाषेने ।
शास्त्राधार त्यागून घोर तप आचरी कोणी ॥5॥
अती कष्टे झिजविती देहातील इंद्रियांना ।
आसूर ते देही मज आत्म्यास देती यातना ॥6॥
आहार त्रिविध होय प्राणिमात्रास जो प्रिय ।
यज्ञ तप नि ज्ञानाचे ऐक ते प्रकार काय ॥7॥
आयुष्य सत्त्व आरोग्य वाढे प्रीति बल सुख ।
रसाळ स्निग्ध टिकाऊ हृद्य आहार सात्त्विक ॥8॥
कडू आंबट खारट कोरडा तिखट उष्ण ।
राजसा प्रिय आहार रोग दुःखाचे कारण ॥9॥

यातयामं गतरसं पूति पर्युपितं च यत् ।
उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥10॥
अफलाकाङ्क्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते ।
यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्त्विकः ॥11॥
अभिसंधाय तु फलं दम्भार्थमपि चैव यत् ।
इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम् ॥12॥
विधिहीनमसृष्टान्नं मन्त्रहीनमदक्षिणम् ।
श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ॥13॥
देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् ।
ब्रह्मचर्यमहिंसा च शारिरं तप उच्यते ॥14॥

रसहीन अपवित्र दुर्गंधित विटलेले ।
अन्न इतरांचे उष्टे तामसी म्हणे भले ॥10॥
कर्तव्य यज्ञी जाणून समाधाने विधिपूर्वक ।
फलेच्छेविना जो यज्ञ करिती तोचि सात्त्विक ॥11॥
आकांक्षा फळाची आणि दांभिकपण ठेऊन ।
जरी विधीसह केला यज्ञ तो भारता राजस ॥12॥
ना विधी ना अन्नदान ना दक्षिणा मंत्र नसे ।
श्रद्धेविना केला यज्ञ त्यास तामस जाण असे ॥13॥
देव गुरु ब्राह्मण पूजा पावित्र्य आणि सौजन्य ।
अहिंसा ब्रह्मचर्य हे शारीरिक तप मान्य ॥14॥

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥15॥
मन:प्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ।
भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥16॥
श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः ।
अफलाकाङ्क्षिभिर्युक्तैः सात्त्विकं परिचक्षते ॥17॥
सत्कारमानपूजार्थं तपो दम्भेन चैव यत् ।
क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥18॥
मूढग्राहेणात्मनो सत्पीडया क्रियते तपः ।
परस्योत्सादनार्थं वा तत्तमसमुदाहृतम् ॥19॥

बोलणे कोणा न दुखवी प्रिय सत्य हितकर ।
आणिक वेदपठण वाचिक तप खरोखर ॥15॥
सौम्यता प्रसन्नचित्त संयम आणि मौन ।
शुद्धता स्वभावाची मानसिक तप जाण ॥16॥
परम श्रद्धेने नरे आचरिले त्रिविध तप ।
फलेच्छा नसता त्याला जाणावे सात्त्विक तप ॥17॥
मानसन्मान पूजा यासाठी जो दांभिक ।
करी ते तप राजस ते निष्फळ नि क्षणिक ॥18॥
मूढपणे हट्टाग्रहाने स्वत:स पीडा देऊन ।
नाशास कोणाच्या केले तप तामस जाण ॥19॥

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम् ॥20॥
यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः ।
दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् ॥21॥
अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते ।
असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ॥22॥
ॐतत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ।
ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ॥23॥
तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः ।
प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम् ॥24॥

उपकारावीण देणे कर्तव्यास्तव जे दान ।
स्थळी काळी पात्री योग्य केले ते सात्त्विक दान ॥20॥
परंतु प्रत्युपकारास फळाच्या उद्देशे पुन्हा ।
करणे अति कष्टाने दान ते राजस जाण ॥21॥
देश काल भलताच अयोग्य मनुष्या दान ।
अवहेलून त्यास दिले ते तामस दान ॥22॥
ब्रह्म निर्देशण्यासाठी उच्चार ॐतत्सदाचा ।
निर्माण याच नामाने ब्राह्मण वेद यज्ञाचा ॥23॥
यास्तव निर्देशती "ओम्" तप यज्ञ दानार्थ ।
ब्रह्मवादी शास्त्रसंमत कर्माच्या आरंभार्थ ॥24॥

तदित्यनभिसंधाय फलं यज्ञतप:क्रिया: ।
दानक्रियाश्च विविधा: क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभि: ॥25॥
सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते ।
प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्द: पार्थ युज्यते ॥26॥
यज्ञे तपसि दाने च स्थिति: सदिति चोच्यते ।
कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते ॥27॥
अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ।
असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥28॥

"तत्" उच्चारती मोक्षास फलाशा नच ठेवता ।
यज्ञ तप दान आदि क्रिया करिती सर्वदा ॥25॥
सद्भावे आणि भक्तिभावे "सत्" शब्द योजती ।
उत्तम कर्मास तसे पार्था "सत्" योजताती ॥26॥
यज्ञ तप दानातील पूर्णत्व हेच "सत्" होय ।
परमात्म्यास्तव केले ते कर्म हे ही "सत्" होय ॥27॥
अश्रद्धेने केले दान हवन अथवा तप ।
"असत्" ते नच त्या फल इहपरलोकी पार्था ॥28॥

ॐ तत्सदिति श्रीमद्‌भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां

योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे

श्रद्धात्रयविभागयोगो नाम सप्तदशोऽध्याय:॥ 17 ॥

# अथ अष्टादशोऽध्यायः
# मोक्षसंन्यासयोग

अर्जुन उवाच।

संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम् ।
त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ॥1॥

श्री भगवानुवाच।

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥2॥

त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः ।
यज्ञदानतपःकर्म न त्याज्यमिति चापरे ॥3॥

निश्चयं श्रुणु मे तत्र त्यागे भरतसत्तम ।
त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः ॥4॥

अर्जुन म्हणाला ।

महाबाहो मज इच्छा जाणण्या संन्यास आणि ।
त्यागाची भिन्न तत्त्वे केशिसूदन चक्रपाणि ॥1॥

श्री भगवान म्हणाले ।

काम्य कर्माचा त्याग हा 'संन्यास' बुध जाणती ।
त्यागास कर्मफळाच्या पंडित 'त्याग' म्हणती ॥2॥

दोष कर्मात म्हणून त्याज्य मानती पंडित ।
यज्ञ दान तप मात्र सोडू नये दुसरे मत ॥3॥

मम निर्णय त्यागाचा ऐक तू भरतोत्तमा ।
त्रिविध प्रकारे त्याग त्यास जाण नरोत्तमा ॥4॥

यज्ञदानतप:कर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।
यज्ञो ज्ञानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥5॥

एतान्यपि तु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा फलानि च ।
कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥6॥

नियतस्य तु संन्यास: कर्मणो नोपपद्यते ।
मोहात्तस्य परित्यागस्तामस: परीकीर्तित ॥7॥

दु:खमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत् ।
स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत् ॥8॥

कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन ।
सङ्गं त्यक्त्वा फलं चैव स त्याग: सात्त्विको मत: ॥9॥

यज्ञ दान तप कर्मे करावीच न त्याजता ।
ज्ञानी होती पवित्र यज्ञ दान तप करता ॥5॥

पार्था ही सर्व कर्मे सोडून फल आसक्ति ।
कर्तव्य जाण करणे मम मत हे निश्चित ॥6॥

त्यागणे नियत कर्मा अनुचित अयोग्यचि ।
अज्ञानमोहाने त्याग तो त्याग तामसचि ॥7॥

शरीरकष्ट वा दु:ख कर्मी म्हणून करी त्याग ।
त्यागफळ कोठूनि करता हा राजस त्याग ॥8॥

कर्तव्य जाणुनि करी नियत कर्म अर्जुना ।
आसक्ति फलाशा सोडी सात्त्विक त्याग त्या माना ॥9॥

न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते ।
त्यागी सत्त्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः ॥10॥
न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः ।
यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ॥11॥
अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम् ।
भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ॥12॥
पञ्चैतानि महाबाहो कारणानि निबोध मे ।
सांख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम् ॥13॥
अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।
विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम् ॥14॥

बुद्धि सत्त्वयुक्त त्यागी संशय ज्याचा निःशेष ।
शुभाशुभ कर्मांठायी त्या ना आसक्ति द्वेष ॥10॥
त्याग संपूर्ण कर्माचा अशक्य देहधाऱ्यास ।
करी कर्मफलत्याग जाणतात ‘त्यागी’ त्यास ॥11॥
फल कर्माचे त्रिविध अनिष्ट इष्ट संमिश्र ।
मरणांती मिळे, मात्र संन्यासी यातून मुक्त ॥12॥
सांख्य म्हणती सिद्धीस कर्माच्या पाच कारणे ।
महाबाहो कोणती ते मजपासून जाणणे ॥13॥
कर्ता जीव अधिष्ठान देह करण इंद्रिये ।
विविध यत्न तसेच दैव कारण पाचवे ॥14॥

शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः ।
न्याय्यं वा विपरीतं वा पञ्चैते तस्य हेतवः ॥15॥
तत्रैव सति कर्तारमात्मानं केवलं तु यः ।
पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मति ॥16॥
यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।
हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते ॥17॥
ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना ।
करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसंग्रहः ॥18॥
ज्ञानं कर्म कर्ता च त्रिधैव गुणभेदतः ।
प्रोच्यते गुणसंख्याने यथावच्छृणु तान्यपि ॥19॥

न्याय्य वा विपरीत जे देहे वाचे मनाने ।
आरंभितो कर्म नर ते घडे या पंच कारणे ॥15॥
असे असूनही मूढ बुद्धिसंस्कार ज्या नसे ।
कर्ता आत्म्यास मानती यथार्थ त्यांना न दिसे ॥16॥
ज्यास अहंकार नाही बुद्धि नाही बंधनात ।
मारूनही या जगात न मारी न बंधनात ॥17॥
ज्ञान ज्ञेय ज्ञाता तीन कर्मप्रेरक कारणे ।
इंद्रिये कर्म आणि कर्ता कर्मघटक जाणणे ॥18॥
प्रकृति गुणाने तीन ज्ञान कर्म कर्ता भेद ।
सांख्य मताने प्रकार ऐक ते यथावत ॥19॥

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम् ॥20॥
पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान् ।
वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ॥21॥
यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम् ।
अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ॥22॥
नियतं सङ्गरहितमरागद्वेषतः कृतम् ।
अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्त्विकमुच्यते ॥23॥
यत्तु कामेप्सुना कर्म साहंकारेण वा पुनः ।
क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम् ॥24॥

सर्व जीवात ज्यामुळे एक भाव स्थिती दिसे ।
अव्यय अविभक्त ते सात्त्विक ज्ञान असे ॥20॥
ज्या ज्ञाने पाहती नाना शरीरी वेगळे जीव ।
ते ज्ञान राजस जाण भिन्न जाणे सर्व जीव ॥21॥
जे ज्ञान आसक्त आहे एक कार्यरूपी देही ।
तत्त्वशून्य क्षुद्र असे ते ज्ञान तामस पाही ॥22॥
फलेच्छा आसक्ति विना प्रेम द्वेष विना कर्म ।
विहीत जे ते करणे ते जाण सात्त्विक कर्म ॥23॥
प्रयासे करणे कर्म फळाची इच्छा धरुन ।
खोट्या अभिमानाने जे ते राजस कर्म जाण ॥24॥

अनुबन्धं क्षयं हिंसामनवेक्ष्य च पौरुषम् ।

मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ॥25॥

मुक्तसङ्गोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।

सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते ॥26॥

रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः ।

हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः ॥27॥

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः ।

विषादी दीर्घसुत्री च कर्ता तामस उच्यते ॥28॥

बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु ।

प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनंजय ॥29॥

स्वसामर्थ्या न जाणता न जाणता परिणाम ।

नाश पीडा न पाहता केले ते तामस कर्म ॥25॥

न अहं ना आसक्ति धैर्य उत्साहाने युक्त ।

सिद्धि अपयशी कर्ता निर्विकार तो सात्त्विक ॥26॥

आसक्त कर्मफल लोभी परपीडक अशुद्ध ।

हर्ष खेदी सदा लिप्त कर्ता राजस बद्ध ॥27॥

ताठर कपटी हट्टी आळशी सदैव दुःखी ।

दीर्घसूत्री शास्त्रविरुद्ध कर्ता तामस जाण ॥28॥

गुणानुसार प्रकार बुद्धिधैर्याचे तीन ते ।

वेगळाले सांगतो मी धनंजया ऐक ते ॥29॥

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये ।
बन्धंच मोक्षं च या वेत्ति बुद्धि सा पार्थ सात्त्विकी ॥30॥
यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च ।
अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ॥31॥
अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता ।
सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ॥32॥
धृत्या यया धारयते मनःप्राणेन्द्रियक्रियाः ।
योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्त्विकी ॥33॥
यया तु धर्मकामार्थान्धृत्या धारयतेऽर्जुन ।
प्रसङ्गेन फलाकाङ्क्षी धृतिः सा पार्थ राजसी ॥34॥

करणे न करणे कृति, कार्य अकार्य कोणते ।
बंध मोक्ष भय अभय सात्त्विकी बुद्धि जाणते ॥30॥
जी धर्म अधर्म काय कार्य अकार्य कोणते ।
नच जाणते ती पार्था राजस बुद्धि ओळख तू ॥31॥
बुद्धि तमे भ्रमलेली अधर्मातच धर्म पाही ।
तामसी बुद्धि तीच विपरीत सदा पाही ॥32॥
मन प्राण इंद्रियाच्या क्रिया आवरी निर्धारे ।
योग अभ्यासामुळे ती धृति सात्त्विकी पार्था रे ॥33॥
ज्या धैर्याने अर्जुना धर्म अर्थ काम धारी ।
प्रसंगी फलाकांक्षाही ती धृति राजस खरी ॥34॥

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च ।
न विमुञ्चति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी ॥35॥

सुखं त्विदानीं त्रिविधं श्रुणु मे भरतर्षभ ।
अभ्यासाद्रमते यत्र दुःखान्तं च निगच्छति ॥36॥

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ।
तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ॥37॥

विषयेन्द्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ।
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥38॥

यदग्रे चानुबन्धे च सुखं मोहनमात्मनः ।
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥39॥

भय शोक खेद मोह किंवा पहाणे स्वप्नास ।
दुर्बुद्ध नाही त्यागत ज्या धृतीने ती तामस ॥35॥

सुखाचे तीन प्रकार दुःख नाश जेथे होतो ।
भरतर्षभा ऐक जेथे जीव अभ्यासे रमतो ॥36॥

विषासमान आरंभी परिणामी अमृतचि ।
आत्मशुद्धीमुळे येते ते सुख सात्त्विकचि ॥37॥

इंद्रिय विषय संयोगे अमृत आधी गमते ।
विषारी बनते अंती सुख राजसचि ते ॥38॥

परंतु मोहामुळे जे अमृत आधी नंतर ।
आळस निद्रा प्रमादे भासे तामस सुख बरे ॥39॥

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः ।
सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ॥40॥
ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ।
कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥41॥
शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥42॥
शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्मं स्वभावजम् ॥43॥
कृषिगौरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्मं स्वभावजम् ।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥44॥

सत्त्व रज तमातून मुक्त अशी व्यक्ति लोकी ।
न शक्य दिसणे पार्था पृथ्वी स्वर्ग देवलोकी ॥40॥
ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शुद्रांची ती पांडवा ।
कर्मे विभागली पार्था स्वभाव गुण प्रभावा ॥41॥
शांति संयम पावित्र्य तप सहनशीलन ।
प्रामाणिक ज्ञान आस्तिक्य ब्राह्मणाचे गुण ॥42॥
निर्धार शक्ति दक्षता शौर्य युद्धात स्थिरता ।
नेतृत्वगुण हे क्षत्रिया तसेच तो असे दाता ॥43॥
पशुपालन व्यापार शेती वैश्याचा स्वभाव ।
सेवाधर्म नेमलेला शुद्रांसाठी दास्यभाव ॥44॥

स्वे स्वे कर्मण्यभिरत: संसिद्धिं लभते नर: ।
स्वकर्मनिरत: सिद्धिं यथा विन्देत तच्छृणु ॥45॥

यत: प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानव: ॥46॥

श्रेयान्स्वधर्मो विगुण: परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥47॥

सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् ।
सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृता: ॥48॥

असक्तबुद्धि: सर्वत्र जितात्मा विगतस्पृह: ।
नैष्कर्म्यसिद्धिं परमा संन्यासेनाधिगच्छति ॥49॥

आपापल्या कर्मामध्ये रत राहता सिद्धि मिळे ।
स्वकर्माशी संलग्न ती सिद्धि ऐक कशी मिळे ॥45॥

जेथून भूतांचा जन्म ज्याने सर्व विश्व व्याप्त ।
स्वकर्म पूजेने त्याच्या सिद्धि मानवा प्राप्त ॥46॥

उत्तम परधर्माहून स्वधर्म जरी सदोष ।
स्वत:चे नेमले कर्म केल्या नसे पापदोष ॥47॥

नच त्यागावी कर्मे जन्मजात जरी सदोष ।
कौंतेया वेढितो धूर अग्नीस तसाच दोष ॥48॥

मनोनिग्रही निस्पृह आसक्तिहीन ज्या बुद्धि ।
त्या संन्यास्यास मिळे परम नैष्कर्म्यसिद्धि ॥49॥

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे ।
समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा ॥50॥
बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च ।
शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च ॥51॥
विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः ।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥52॥
अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ।
विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते ॥53॥
ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति ।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ॥54॥

परमसिद्धी पावता प्राप्ती कशी ब्रह्माची ।
संक्षेपे कौंतेया ऐक परम सीमा ज्ञानाची ॥50॥
शुद्ध बुद्धि धैर्याने मनोनिग्रह करून ।
इंद्रिय विषया त्यागे प्रीति द्वेषास सोडून ॥51॥
एकांती मिताहारी काया वाचा मन आवरी ।
ध्यान योग पारंगत नित वैराग्यी वावरी ॥52॥
बल दर्प अहंकार क्रोध परिग्रह काम्यता ।
त्यागुनि निर्मम शांत त्यांना ब्रह्मपद योग्यता ॥53॥
ब्रह्म पावता ते प्रसन्न त्यांना कांक्षा नसे शोक ।
समानता भूती माझी मिळे श्रेष्ठ भक्ति एक ॥54॥

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः ।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम् ॥55॥
सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ।
मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ॥56॥
चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः ।
बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ॥57॥
मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।
अथ चेत्त्वमहंकारान्न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि ॥58॥
यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥59॥

कोण किती व्याप्ती माझी ते भक्तीनेच जाणतो ।
तत्त्वतः मज जाणून मम धामी प्रवेशतो ॥55॥
जरी सर्व कर्मे करी भक्त माझ्या आश्रयात ।
प्रसादे माझ्या अव्यय शाश्वत पद त्या प्राप्त ॥56॥
मनःपूर्वक कर्मांना अर्पूनि मज निश्चिंत ।
बुद्धियोगाच्या आश्रये एकरूप हो मच्चित्त ॥57॥
ममचित्त होता संकटा मत्प्रसादे तरसी ।
अहंभावे न ऐकसी सर्वनाशास पावसी ॥58॥
अहंकार धरुनी तू म्हणसी नच लढणार ।
व्यर्थ निश्चय तो तुझा क्षात्रभावे लढणार ॥59॥

स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा ।
कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ॥60॥
ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ॥61॥
तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।
तस्मात्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥62॥
इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ।
विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥63॥
सर्वगुह्यतमं भूयः श्रृणु मे परमं वचः ।
इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ॥64॥

मोहग्रस्त ना इच्छिसी लढण्या नाकारतो तू ।
परतंत्र स्वभावाने तेच कार्य करशील तू ॥60॥
हृदयात सर्वांच्या तो अर्जुना ईश राहतो ।
भ्रमवितो सर्व जीवा मायेच्या यंत्रावरी तो ॥61॥
त्यालाच सर्व भावाने जावे शरण भारत ।
त्या प्रसादे शांति श्रेष्ठ शाश्वत स्थान प्राप्त ॥62॥
हे ज्ञान सांगितले मी गुह्यामधील गुह्य ते ।
विचार करुनी पूर्ण वर्त तू इच्छिशील ते ॥63॥
पुन्हा तू ऐक माझे गुह्यतम हे वचन ।
सांगतो तुज तू प्रिय तव हिताचे म्हणून ॥64॥

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ॥65॥
सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥66॥
इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ।
ना चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥67॥
य इमं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति ।
भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः ॥68॥
न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः ।
भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि ॥69॥

चिंतून मम माझा भक्त पूज मज नमस्कारे ।
मजसी तू पावशील प्रिय ते मज हे खरे ॥65॥
सर्व अज्ञानी धर्मांना त्यागून मज ये शरण ।
सर्व पापातून मुक्त निश्चिंत तुज मी करीन ॥66॥
जो नच करी तप अथवा गुरुभक्ति नाही ।
अनिच्छ हे ऐकण्यास कधी त्या सांगणे नाही ॥67॥
परम रहस्य जो हे कथील भक्तांना मज ।
परम भक्ति ठेऊन निःसंशये प्राप्त मज ॥68॥
त्याच्याहून अन्य कोणी प्रियतम मानवात ।
भविष्यातही कोणी नाही प्रिय जगात ॥69॥

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ।
ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ॥70॥

श्रद्धावाननसूयश्च श्रृणुयादपि यो नरः ।
सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ॥71॥

कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा ।
कच्चिदज्ञानसंमोहः प्रनष्टस्ते धनंजय ॥72॥

अर्जुन उवाच।

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ।
स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ॥73॥

संवाद आपुला धर्म्य अभ्यासील हा जो नर ।
त्याने पूजिले मजला ज्ञानयज्ञे खरोखर ॥70॥

श्रद्धेने विनाद्वेषे नर यास श्रवण करतो ।
पापमुक्ति मिळून तो पुण्यलोकास पावतो ॥71॥

चित्त एकाग्र ठेऊन ऐकलेस ना तू पार्था ।
अज्ञान मोह तुझा आता विरला का धनंजया ॥72॥

अर्जुन म्हणाला ।

मोह गेला भान आले प्रसादे तव अच्युता ।
विरला संदेह तव पाळीन वचन आता ॥73॥

संजय उवाच।

इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः ।

संवादमिममश्रौषमजुतं रोमहर्षणम् ॥74॥

व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम् ।

योगं योगेश्वरात्कृष्णात्साक्षात्कथयतः स्वयम् ॥75॥

राजन्संसमृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतम् ।

केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ॥76॥

तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः ।

विस्मयो मे महाराजन्हृष्यामि च पुनः पुनः ॥77॥

यत्र योगेश्वरः कृष्णः यत्र पार्थो धनुर्धरः ।

तत्र श्रीर्विजयो भूतिर्धुवा नीतिर्मतिर्मम ॥78॥

संजय म्हणाला ।

वासुदेव आणि पार्थ महात्म्यांचा मी पहा ।

रोमहर्षक अद्भूत संवाद ऐकला अहा ॥74॥

व्यास मुनींच्या प्रसादे परम गुह्य ऐकिले ।

योगेश्वर कृष्णाने ज्ञान स्वयेच सांगितले ॥75॥

आठवून हे राजन संवाद मी अद्भुत ।

कृष्णार्जुनांचा पुण्यद पुन्हः पुन्हा मी हर्षित ॥76॥

पुन्हा पुन्हा मी स्मरून हरीचे रूप अद्भूत ।

आश्चर्याने महाराज पुन्हा पुन्हा मी हर्षित ॥77॥


जेथे योगेश्वर कृष्ण जेथे धनुर्धर पार्थ ।

श्री विजय सामर्थ्य नि नीति मम मत सार्थ ॥78॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां

योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे

मोक्षसंन्यासयोगो नामाष्टादशोऽध्यायः॥ 18 ॥



पृथ्वीराज भालेराव

*शब्दांना शब्द लावले अक्षरा अक्षरे रचली*
*धूळाक्षरांची ही माला गुरुचरणा अर्पिली ।*
*शब्दबोध अर्थबोध मज नाहीच जाहला*
*गुरुदेवा तुम्ही आता नाव लावा पैलाला ॥*
*मज काहीच समज नाही नाही समजे ज्ञान*
*मस्तकावर हात ठेवा द्या अनुभवाचे भान ।*
*मनी मानसी पूजले तुम्ही आणि नामदीक्षा*
*प्रेयासह श्रेयाचीच मज तुम्ही घाला भिक्षा ॥*

*कोंडेजकर हे कूळ भगवान नामे पिता*
*शशिकांत हे स्वनाम सुव्रत गुरु हे त्राता ॥*

# ई साहित्य प्रतिष्ठान

इंटरनेट आणि मोबाईल क्रांतीचा उपयोग मराठी भाषेच्या, साहित्याच्या आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी करणाऱ्या अनेक संस्था आहेत. त्यातील एक आहे ई साहित्य प्रतिष्ठान. ई साहित्य प्रतिष्ठान दरमहिन्याला किमान चार ते दहा मराठी ई पुस्तके प्रकाशित करून ती सुमारे सव्वा दोन लाख वाचकांपर्यंत पोहोचवते. यात खेड्यापाड्यातील वाचक असतात तसेच सातासमुद्रापलिकडचेही.

आपण ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद झालात का?

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे.

आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं

म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

अधिक माहितीसाठी, आम्ही कोण ते जाणून घेण्यासाठी एकदातरी www.esahity.com या वेबसाईटला भॆट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान